आला आला पाऊस आला..
रेनकोट / 2 in1 जर्किन
लहान मुलांपासून सर्वांसाठी
Branded Zeel/Boss/Only One Complete Range..!
आता पुण्यात सुद्धा..
जरीवाला
कापड बाजार, फोन नं. 7666510765
यशोदानगर, पाईपलाईन रोड, अ.नगर
सिंहगड रोड, त्रिमुर्ती हॉस्पिटल जवळ, योगेश मेडीकल शेजारी, पुणे. मो. 7775089505

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, गुरुवार दि. २६.०६.२०२५ | अंक नं. ७५ | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

Elite banquet
A.C. बँक्वेट हॉल
अहिल्यानगर मध्ये पहिल्यांदा ए.सी. बँक्वेट हॉल,
भव्य हॉल व प्रशस्त पार्किंग
* वाढदिवस, लग्नाचा वाढदिवस
* शुभकार्य, साखरपुडा
* डोहाळे जेवण, मुंज
* नामकरण समारंभ
* कॉर्पोरेट इव्हेंट्स
व इ. कार्यक्रमासाठी उपलब्ध
हॉटेल संकेत
टिळक रोड, स्वस्तिक चौक, स्टेशन रोड, अहिल्यानगर
9422222020

स्मार्ट असो वा मार्ट..मिल असो वा मॉल...
सर्वात स्वस्त देणार फक्त राजपाल !
आला रे आला राजपाल सेल आला..!
खरेदी → खरेदीवर पॉइंट → पॉइंट्सवर गिफ्ट
30 ते 70% डिस्काउंट सेल
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

5gm सोन्याच्या सुवर्णखरेदीवर
स्क्रॅचकार्डव्दारे
जिंका दुबई ट्रिप
किंवा आकर्षक गिफ्ट बॉक्स व सोबतच
हमखास मजुरीवर भरघोस डिस्काऊंटही..
चलो दुबई
+
सोन्याच्या दागिन्यांच्या मजुरीवर
15%*
पर्यंत सूट
Conditions Apply*
चंदुकाका ज्वेल्स
सोनेरी नातं..
शॉप नंबर 2/3, साई मिडास टच, नगर-मनमाड रोड,
सावेडी, अहिल्यानगर 9272422001/02

# प्रशासनाच्या दुर्लक्षाने जलवाहिनी फुटली; पाणी थेट उपनगरातील नागरिकांच्या घरात

नगर – शहरातील तारकपूरच्या प्रभाग क्रमांक ४ मध्ये पिण्याची जलवाहिनी पुन्हा फुटल्यामुळे अनेक नागरिकांच्या घरात व परिसरात पाणी शिरले. या प्रकारामुळे वृद्ध आणि आजारी नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागले. दोन महिन्यांपूर्वीही याच ठिकाणी अशाच प्रकारची घटना घडली होती. मात्र तरीही अहिल्यानगर महानगरपालिकेतील प्रशासनाने याकडे गांभीर्याने पाहिले नाही. सध्या कारभार प्रशासकांच्या हातात असून देखील वारंवार अशा घटना घडणे, हे त्यांच्या कामकाजावर मोठे प्रश्नचिन्ह निर्माण करते.





महानगरपालिकेने नुकतीच पाणीपट्टी वाढवली आहे, पण तरीही शहरातील अनेक भागांमध्ये वेळेवर व योग्य दाबाने पाणीपुरवठा होत नाही. प्रशासन नागरिकांकडून पैसे घेत आहे मात्र सेवा देण्यात पूर्ण अपयशी ठरत आहे.

नगरसेवक योगीराज गाडे, वैभव सांगळे व स्थानिक नागरिकांनी घटनास्थळी धाव घेतली आणि घरांमधील पाणी काढले. प्रशासनाला जाब विचारत लवकरात लवकर जलवाहिनीच्या दुरुस्तीची आणि कायमस्वरूपी उपाययोजना करण्याची मागणीही त्यांनी केली.

प्रशासनाच्या निष्काळजीपणामुळेच अशा घटना वारंवार घडत आहेत. याबाबत वेळीच उपाययोजना कराव्यात, अन्यथा नागरिकांचा संयम सुटल्याशिवाय राहणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला.

BRANDED
जीन्स व फॉरमल पॅन्ट
₹ 500 ला एक
₹ 900 ला दोन
₹ 1200 ला तीन
*मर्यादित स्टॉक
भरपूर व्हरायटीज्
अहिल्यानगर शहरातील भव्य मॉल पुरुषांसाठी सर्व काही
शुभ मॉल
मयुरी लेडिज मॉलच्या वर
मल्हार चौक, आयकॉन पब्लिक स्कुल जवळ, आगरकर मळा, अहिल्यानगर. ९०२८२०११८८

महाराष्ट्रातील सर्वात स्वस्त मॉल
महावीर मॉल...
- 4x6 साईझ कोल्हापूर चटई 99/- रु.
- पानिपत वेलवेट आसन 30/- रु
- कॉटन पायपुसणी मोठी 30/- रु
- जम्बो साईझ टॉवेल 99/- रु.
- कॉटन रुमाल 99/- रु. 10 नग
- मॅजिक बाथरूम मॅट 2X3 साईझ 149/- रु.
- डबल बेड बेडशीट 299/- रु
- लेडीज ट्रॅव्हल बॅग 99 /- रु.
मार्केट पेक्षा वेगळ पाहिजे तर मार्केट पेक्षा वेगळ्या ठिकाणी यावे लागेल.
अधिक माहितीसाठी भेट द्या..
श्री महावीर कलेक्शन
मारुती मंदिरा समोर, मर्चंट बँके जवळ,
मार्केटयार्ड, अ.नगर. Mo. 98222 52001

**चौथे पुण्यस्मरण**
***

जिन्दगी का सफर ही थोडा अलग है ।
उस में अपने लोगों की यादों की नमी हमेशा है ।



**स्व.सौ.पुष्पाताई मदनलालजी कोठारी**
स्व.दि. २७/६/२०२१

आपल्या पावन स्मृतीस भावपूर्ण श्रध्दांजली!

: दुःखांकित :
श्री.मदनलालजी कोठारी
सौ कल्पना आनंद कोठारी, सौ.सोनाली अभय कोठारी
सौ. चैताली आदेश सोळंकी । ऋषभ, प्रणव, नयन, नमन, पूर्वा, श्रुती
एवम् कोठारी परिवार, अ.नगर,पुणे

डॉ.अद्वैत गिते
MBBS, MD (Medicine)
DM (Neurology)
न्युरो फिजिशिअन
* चेहऱ्यावरील स्नायू फडकणे यासाठी बोटॉक्स इंजेक्शनची सुविधा
* पाठदुखी/मज्जा रज्जूरील आजार * डोळ्यांच्या नसांवरील सूज/ऑप्टीक न्यूरैटिस
यावरील सर्व आजाराच्या निदानासाठी जपानमधील अत्याधुनिक सुप्रसिध्द निहोन- कोडेन कंपनीचे EEG, NCV, EMG मशीन उपलब्ध.
* सर्व आजारांसाठी ॲडमिट सुविधा उपलब्ध.
* सर्व नामांकित कंपन्यांचे कॅशलेस सुविधा उपलब्ध.
अक्षय (गिते) हॉस्पिटल
बालिकाश्रम रोड, कॉस्मिक सोसायटीशेजारी, अहमदनगर
मो : 9257575718, 9764416136
तपासणी शिबीर फक्त अक्षय (गिते) हॉस्पिटल येथे आहे

CERTIFICATE COURSE IN ADVANCE ACCOUNTING
An ISO 9001:2015 Certified
DiSHA® COMPUTER INSTITUTE
COURSE DETAILS
COMPUTER APPLICATION
ADVANCE ACCOUNTING
TAXATION, BANKING
AUDITING
CAA IS NOT JUST A COURSE BUT A GREAT INVESTMENT IN YOUR CAREER
100% JOB ASSISTANCE
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Ambar Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769
Experience Faculties | 1 Lac + Students Trained | Job Assistan

विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
30 ते 70% डिस्काउंट सेल
खरेदी → खरेदीवर पॉइंट → पॉइंट्सवर गिफ्ट
आला रे आला राजपाल सेल आला..!
संगमनेर (02425) 222226 | अहिल्यानगर (0241) 2999299 | नारायणगाव (02132) 242132 | श्रीरामपूर (02422) 220090

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रेरणादायी अक्षरधन...



### लोकमान्य – राजर्षी राजे शाहू महाराज

शतकापूर्वीचा लोकनेता, आदर्श राजा म्हणजे स्व. शाहू महाराज. रयतेचा ध्यास, कल्याण ह्या उद्देशाने जीवन जगणाऱ्या शाहू महाराजांचा २६ जून रोजी जयंती दिन.

शाहू महाराजांनी कोल्हापूर संस्थानातील शिक्षण, शेती, उद्योग व सर्वांगिण क्षेत्रांसाठी प्रचंड कार्ये उभी केली. त्या कार्याचा महिमा इतका मोठा की आजही ती सर्व कार्ये मार्गदर्शक व अनुकरणीय ठरतील.

शेती व शिक्षणात ते विशेष कार्यमग्न होते. शेतकरी असल्याचा अभिमान त्यांच्या अनेक भाषणांत होता.

''मी केवळ शेतकरी व महान पराक्रमी छत्रपती शिवाजी महाराज व त्यांच्या स्नुषा ताराबाई महाराणीसाहेब यांच्या वंशातला आहे.'' तसेच ते म्हणत, ''कृषिकर्म इतके पवित्र आहे की, वैदिक काळात वर्षातून एकदा चक्रवर्ती राजा व त्याचे मंत्रीही नांगर हाकीत असत. कृषिकर्म करतांना क्षात्र धर्माला बाधा येते असे नाही. त्यावरच तर मानवी समाजाची सुव्यवस्था व उन्नती अवलंबून आहे. त्यात आपला देश कृषिप्रधानच आहे.

राजर्षी शाहू महाराजांनी शेतकरी, उद्योगांच्या सर्वंकष प्रगतीसाठी केलेले प्रयत्न व उपाय सुवर्णमोलाचे आहेत. त्यांनी प्रगत शेतीचे केवळ उपाय सुचवले नाही तर शेतकऱ्यांना प्रेरणा, दिशा देणारे प्रयोगही केलेत.

कोल्हापूर संस्थानातील सह्याद्री घाट प्रदेशात – पन्हाळा, भुदरगड पेटास या डोंगराळ प्रदेशात चहाची लागवड सुरू केली. तो पन्हाळा चहा क्र. ४ चे कौतुक बडोद्याचे महाराज सयाजीराव गायकवाड यांनी सुद्धा केले.

चहा, कॉफीच्या लागवडीच्या धर्तीवर त्यांनी तज्ज्ञ वनाधिकारांच्या देखरेखीत वेलची लागवड सुरू केली. नंतर १९०४ मध्ये 'देवकापूस' नामक उत्कृष्ट कापसाचा प्रयोग केला.

लिंबू ग्रास व नीलगिरी तेल उत्पादनात त्यांनी रस घेतला. दोरखंडाच्या उद्यागासाठी झाडांची लागवड करवली. मधमाशी पालन उद्योगासाठीही विशेष प्रयत्न केले. व्हिनगर व डांबर यासारख्या द्रव्य पदार्थांच्या निर्मितीसाठी लाकडाच्या उर्ध्वपातनाच्या प्रयोगांनाही त्यांनी प्रोत्साहन दिले. किल्ल्यांवर पडलेल्या तोफा किर्लोस्करांना देऊन नांगर बनवण्यास सांगितले. तात्पर्य दूरदृष्टीने रतेच्या कल्याणार्थ हा राजा जगला व अमर झाला. **(संदर्भ – कोल्हापूरचे इतिहासतज्ज्ञ राम यादव)**

# राज्य सरकारकडून जनतेच्या पदरी निराशा; सरकारच्याविरोधात संभाजी ब्रिगेड आक्रमक

नगर – राज्यात महायुतीचे सरकार येऊन ६ महिन्याचा कालावधी लोटला आहे. हे सरकार सर्व बाबतीत अपयशी ठरले आहे. सरकारच्या कारभाराबाबत जनतेमध्ये निराशा आहे. त्यामुळे सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी संभाजी ब्रिगेड येत्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या मैदानात उतरणार आहे. याबाबतचा निर्णय अहिल्यानगरमध्ये घेण्यात आला. अहिल्यानगरच्या शासकीय विश्रामगृहावर प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्त्यांची बैठक पार पडली. यात निवडणुकीच्या अनुषंगाने संघटना बांधणी करण्यात आली. या बैठकीत निरिक्षक कमिटीचे सदस्य व प्रदेश संघटक डॉ. बालाजी जाधव, अतुल गायकवाड, रमेश गायकवाड, राज्याचे उपाध्यक्ष अण्णासाहेब सावंत, मराठा सेवा संघाचे अध्यक्ष इंजि.सुरेश इथापे आदी उपस्थित होते.



सर्वसामान्यांच्या प्रश्नांना न्याय देण्यासाठी संभाजी ब्रिगेड येत्या स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीच्या मैदानात उतरणार असल्याचे संघटनेच्या बैठकीत ठरविण्यात आले.

यावेळी बोलताना डॉ. बालाजी जाधव म्हणाले की, राज्यात सरकार येवून जवळपास ६ महिने उलटले आहे. परंतु, अद्यापही शेतकरी, विद्यार्थी, महिला, व्यापारी आदींचे प्रश्न जैसे थे आहेत. जर सरकारला सर्वसामान्यांचे प्रश्न सोडवता येत नसतील तर त्यांना ताळ्यावर आणण्यासाठी संभाजी ब्रिगेड आक्रमक भूमिका घेत आहे. ८० टक्के समाजकारण आणि २० टक्के राजकारण संभाजी बिग्रेड करते. सर्वसामान्यांच्या प्रश्नावर संभाजी ब्रिगेडने आक्रमक आंदोलने करुन अनेकांना न्याय मिळवून दिला आहे.

अतुल गायकवाड यांनी सांगितले की, गेल्या अनेक दिवसांपासून काही अपप्रवृत्ती खोटा इतिहास समाजात रुजवण्याचा प्रयत्न करत आहेत, त्यांना देखील संभाजी ब्रिगेडच्या स्टाईलने उत्तर देत खरा इतिहास हा बहुजन समाजाच्या समोर आणला आहे. शेतकऱ्यांच्या मालाला भाव मिळावा यासाठी वारंवार मागणी केली आहे. मात्र, नाकर्ते सरकार भाव देण्यासाठी अनुकूल नसल्याने आता राजकीय पटलावर संभाजी ब्रिगेड मैदानात उतरली असून सर्वसामान्यांना न्याय मिळवून देणे यासाठी काम करत आहे.

रमेश गायकवाड यांनी सांगितले की, संभाजी ब्रिगेड आता राजकारणाच्या मैदानात उतरल्याने अनेकांच्या पायाखालची वाळु सरकली आहे. संभाजी ब्रिगेड आणि इतर सर्व कक्षांची जिल्ह्यात बांधणी केली तर राजकिय सत्ता दुर नाही.

अण्णासाहेब सावंत म्हणाले की, अहिल्यानगर जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडचे काम अतिशय चांगले असून भविष्यात सर्वसामान्यांना न्याय देण्याचे काम ब्रिगेडच्या माध्यमातून केले जाणार आहे. जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांनी गाव गाव पिंजून काढले असून जिल्ह्यात ३५० च्या वर शाखा कार्यरत असल्याने इतर कक्षांची देखील बांधणी होणे गरजचे असल्याचे मत त्यांनी व्यक्त केले.

सुरेश इथापे यांनी बैठकीत मार्गदर्शन करताना सांगितले की, जिल्ह्यात संभाजी ब्रिगेड सक्षम असून इतर कक्षांची देखील लवकरच बांधणी पुर्ण करणार आहे. जिल्ह्यात संभाजी ब्रिगेडच्या शाखा गाव तेथे करण्याचा राजेश परकाळे यांचा मानस असल्याने त्यांना शुभेच्छा दिल्या.

राजेश परकाळे म्हणाले की, संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून बहुजन समाजातील जनतेला आपण न्याय देण्याचा प्रयत्न करत आहोत. संभाजी ब्रिगेडची बांधणी करताना अनेक अडचणी आल्या त्यावर मात करत आज जवळपास ३६० शाखा जिल्ह्यात कार्यरत आहेत. परंतु यावर आपण थांबणार नसून गाव तेथे शाखा असा आपला पुढील अजंठा आहे. येणाऱ्या निवडणुकीत संभाजी ब्रिगेडचा झेंडा स्थानिक स्वराज्य संस्थांवर फडकवणारच असा मानस व्यक्त केला.

संभाजी ब्रिगेडच्या महिलाध्यक्षा राजश्री शिंदे म्हणाल्या की, संभाजी ब्रिगेडच्या माध्यमातून आपण दोन महिन्यापासून काम करत आहोत. यामध्ये महिला सक्षमीकरण आणि महिलांना आपल्या पायवर उभा राहण्यासाठी आपला प्रयत्न आहे. त्यासाठी विविध प्रकारचे कॅम्प आयोजित करणार असून महिला सक्षम झाली तर संपुर्ण घर सक्षम होते. या प्रमाणे महिला उद्योजिका तयार करण्याचा मानस आहे.

या बैठकीत आम आदमी पक्षाच्या महिला नेत्या ॲड. दामिनी नगरे तसेच विविध संघटना व पक्षाचे सतीश नाना श्रीराम, प्रफुल्ल (बापू) जगताप, सौरभ शितोळे सर, पांडुरंग अंकुश खोरे, संदीप शिवाजी गोरे, कय्युम हैदर शेख, सुरजित गायकवाड, शुभम सांगळे, कृष्णा जगताप, आयुब शेख, संगीता बाबासाहेब शिंदे, जयश्री रोहकले, संपत जाधव, ॲड सोमनाथ गोपाळे, संतोष भिसे, रामकृष्ण पवार, नितीन शेलार, सज्जन पोकळे, रमजान शेख, सुशेन कदम, नागेश खेडकर, अमोल आरडे, अनिकेत शिंदे, वैभव काळदाते आदींनी संभाजी ब्रिगेड मध्ये प्रवेश केला.

या बैठकीसाठी जिल्हा महासचिव निलेश बोरुडे, प्रवीण भोर, जिल्हा कार्याध्यक्ष शरद जोशी, सुदाम कोरडे, दत्ता भोसले, राजेंद्र राऊत, जिल्हा उपाध्यक्ष विठ्ठल देठे, सुनील जगताप, इंजि. विशाल मांडगे, अंकुश जगताप, अरविंद गेरंगे, प्रशांत औटी, संजय सोनवणे, अवि मेढे, बंटीभाऊ भिंगारदिवे, लक्ष्मण खोडदे, तालुकाध्यक्ष डॉ. राहुल देशमुख, इंजि. शाम जरे, सचिन काकडे, लक्ष्मण गायके, वैभव लाळगे, राजू काटकर, सूरज कराळे आदी उपस्थित होते.

# हिंदी भाषेच्या सक्तीकरणाच्या विरोधात ६ जुलैला मुंबईत मोर्चा

नगर – मराठी भाषेच्या मुद्द्यावर आक्रमक भूमिका घेत ६ जुलै रोजी मोर्चा काढण्याची घोषणा मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी केली आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी महाराष्ट्र नवनिर्माण सेना प्रमुख राज ठाकरे यांची आज भेट घेतली. राज्यात हिंदी भाषेच्या सक्तीच्या मुद्द्यावर शिक्षणमंत्र्यांनी राज ठाकरे यांच्याकडे सरकारची भूमिका मांडली. मात्र ही भेट झाल्यानंतर राज ठाकरे यांनी आपण सरकारची भूमिका पूर्णपणे फेटाळली असल्याचे स्पष्ट केले आहे. इतकेच नाही तर बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना त्यांनी ६ जुलै रोजी मुंबईत मोर्चा काढणार असल्याची घोषणा देखील केली आहे. गिरगाव ते आझाद मैदान असा हा मोर्चा काढला जाणार आहे.



या संपूर्ण गोष्टीला आमचा पूर्णपणे विरोध असेल, आहे, राहणार. हिंदी किंवा इतर कुठल्याही भाषेची सक्ती महाराष्ट्रात होऊ देणार नाही म्हणजे नाही. आणि या गोष्टींसाठी म्हणून, मी सर्व पक्षांना मी आवाहन करतोय, ६ जुलैला गिरगाव चौपाटीवरून मोर्चा काढण्याचा निर्णय आम्ही घेतला आहे. त्या संपूर्ण मोर्चामध्ये कुठेही कोणताही झेंडा नसेल. तो संपूर्ण मोर्चा मराठी माणसाचा असेल, त्या मोर्चाचे नेतृत्व मराठी माणूस करेल, अशी घोषणा राज ठाकरे यांनी यावेळी केली.

आम्ही शिक्षणतज्ज्ञ, भाषातज्ज्ञ, साहित्यिक आणि इतर सर्वांशी आम्ही बोलणार आहोत, त्यांना माझं पत्र जाणार आहे. सर्वांना आम्ही बोलवत आहोत, सर्व पालक, सर्व विद्यार्थ्यांना आम्ही निमंत्रण देत आहोत. सरकारला एकदा कळू देत की महाराष्ट्राच्या मनात नेमकं काय आहे ते. ६ जुलै रोजी सकाळी १० वाजता गिरगाव चौपाटीवरून हा मोर्चा निघेल, अशी माहिती देखील राज ठाकरे यांनी दिली. विद्यार्थी आणि पालकांना यायला जमेल म्हणून मोर्चासाठी रविवारचा दिवस निवडल्याचेही राज ठाकरे यावेळी म्हणाले. तसेच इतर राजकीय पक्षांची देखील आपण चर्चा करणार असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

हा जो कट आहे– याला मी कटच म्हणेन, महाराष्ट्राचं मराठीपण घालवण्याचा जो कट आहे, हा उध्वस्त करण्यासाठी सर्वांनी या मोर्चात सहभागी व्हावे. इथे कोणताही झेंडा नसेल फक्त मराठी हा एक अजेंडा असेल. या अजेंड्यासाठी महाराष्ट्रातील मराठी बांधवांनी या मोर्चात सहभागी व्हावं. सर्व विरोध दर्शवत आहेत. मला अशावेळी हेही बघायचंय की राजकीय पक्षांव्यतिरिक्त कोण–कोण मोर्चात सहभागी होत आहेत आणि कोण येणार नाहीत हेही मला बघायचं आहे, असेही राज ठाकरे म्हणाले.

# नगरमध्ये आठवीतील मुलाकडून दहावीतील मुलाचा चाकूने खून

नगर – इयत्ता दहावीच्या परीक्षेसाठी शाळेत गेलेल्या विद्यार्थ्याचा शिक्षकांच्या समोर आठवीतील मुलाने चाकूने वार करून खून केल्याची घटना शहरातील बागडपट्टी परिसरातील सिताराम सारडा विद्यालयात २५ जून रोजी दुपारी ३.३० वाजण्याच्या सुमारास घडली.



मुस्तकीन तनवीर शेख (वय १५, रा. कौलारु कॅम्प, सर्जेपुरा) हा सिताराम सारडा विद्यालयात इयत्ता दहावीत शिक्षण घेत होता. २५ जून रोजी दुपारी सुमारे ३.३० वाजण्याच्या सुमारास शाळेच्या मधल्या सुट्टी दरम्यान इयत्ता आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या मुलाने मुस्तकीनवर शाळेच्या पोर्चमध्ये चाकूने वार केले. डोक्यावर व पोटावर गंभीर स्वरूपाचे वार झाल्याने मुस्तकीन रक्ताच्या थारोळ्यात पडला. ही घटना घडताच शिक्षक रामकृष्ण कुलकर्णी व अमोल कदम यांनी तातडीने जखमी मुस्तकीनला सिव्हील हॉस्पिटल येथे दाखल केले. मात्र, उपचारापूर्वीच मृत झाला असल्याचे डॉक्टरांनी घोषित केले.

याबाबत मृत मुस्तकीनचा वडील तनवीर सिकंदर शेख (वय ३८) यांनी तोफखाना पोलीस स्टेशन येथे दिलेल्या फिर्यादीत सांगितले की, फिर्यादी यांचा मुलगा मुस्तकीन यास मागील काही महिन्यांपासून क्रिकेट खेळण्याच्या कारणावरुन शेख कुटुंबीयाकडून जिवे मारण्याच्या धमक्या दिल्या जात होत्या. याबाबत या पूर्वी २०२४ मध्ये पोलिसांत तक्रार दाखल केली होती

याबाबत मुस्तकीनच्या मामाला फोनवर घटनेची माहिती देऊन 'तुमचा भाचा मुस्तकीन यास शाळेत मारले असल्याचे सांगितले'. या माहितीवरुन फिर्यादी व मामा हे शाळेत गेले असता शाळेतील शिक्षकांनी त्यांना सांगितले की, मुस्तकीन यास आठवीतील एका विद्यार्थ्याने त्याच्या डोक्यावर, पोटात चाकूने वार केले. जखमी मुस्तकीन यास सिव्हिल हॉस्पिटल येथे घेऊन गेले आहे. यावर फिर्यादी व त्याचे मामा सिव्हिल हॉस्पिटलमध्ये गेले असता तेथे मुस्तकीन हा उपचारापूर्वीच मयत झाला असल्याचे समजले.

तोफखाना पोलीस ठाण्याचे अधिकारी घटनास्थळी दाखल झाले आहेत.

याप्रकरणी बी एन एस कलम १०३ (१) प्रमाणे खुनाचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक मंगेश गोटला हे करीत आहेत

### वेणुबाई साबळे यांचे अल्प आजाराने निधन



नगर – सारसनगर येथील रहिवासी वेणुबाई शाम सुंदर साबळे (वय ७९) यांचे २५ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर जयपूर येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे ३ मुले, सुना, नातवंडे असा परिवार आहे. प्रविण साबळे, प्रमोद साबळे, प्रदीप साबळे यांच्या त्या मातोश्री होत.

## सभापती राम शिंदे यांच्या अहिल्यानगर दौऱ्याप्रसंगी सुरक्षा व राजशिष्टाचाराबाबत गंभीर त्रुटीसंदर्भात दोषी पोलीस निलंबित

मुंबई – महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या २२ जून रोजीच्या अहिल्यानगर शहरातील दौऱ्यादरम्यान गंभीर स्वरूपाच्या सुरक्षा व राजशिष्टाचाराबाबतच्या त्रुटी आढळून आल्याने कर्तव्यात कसूर केलेले पोकॉ. भगवान रामदास वाघुले यांना पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर यांनी निलंबित केले आहे.

अहिल्यानगर संलग्न जिल्हा विशेष शाखा, अहिल्यानगर परिक्षेत्राचे पोकॉ. भगवान रामदास वाघुले यांनी महाराष्ट्र विधान परिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या सावेडी, अहिल्यानगर येथील नियोजित दौऱ्यादरम्यान सुरक्षासेवेत कायदेशीर कर्तव्य पार न पाडल्याने व बेजबाबदार, बेशिस्त आणि हलगर्जीपणाचे वर्तन केल्याने शासन सेवेतून त्यांना निलंबित करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.


कार्यक्रमाच्या ठिकाणी पुरेसा पोलिस बंदोबस्त न नेमल्याची तसेच स्थानिक पोलिस ठाण्याचे प्रभारी अधिकारी बंदोबस्तासाठी हजर नसल्याची बाब चौकशीअंती स्पष्ट झाली असता सदरील कसुरीबाबत चौकशी करण्यात आली. चौकशीअंती दोषी पोलिस पोकॉ. भगवान रामदास वाघुले यांच्याविरुद्ध शिस्तभंगविषयक कडक कारवाई व निलंबनाचे आदेश अहिल्यानगरचे पोलिस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांनी दिले आहेत.



प्रेमदान चौकातील सिग्नल बंद असल्याने सतत वाहतूक कोंडी होते. (छाया – धनेश कटारिया)

# दिंडीतील वारकऱ्याचे नगरजवळ हृदयविकाराच्या झटक्याने निधन

नगर – कोपरगाव येथील संवत्सर इथून पंढरपूरकडे पायी चाललेल्या दिंडी सोहळ्यातील वारकऱ्याचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झाल्याची घटना नगर तालुक्यातील साकत येथे २५ जून रोजी दुपारी २ वाजताच्या सुमारास घडली. पुंडलिक गोपाळा आगवन (वय ७५ रा. संवत्सर, लक्ष्मण वाडी, तालुका कोपरगाव) असे मृत वारकऱ्याचे नाव आहे.



पुंडलिक आगवन

कोपरगाव येथून निघालेल्या दिंडीचा नगर तालुक्यातील साकत येथे मुक्काम असताना आगवान यांना ताप आला. त्यावेळी दिंडीतील वारकऱ्यांनी त्यांना गोळ्या दिल्या. परंतु त्यांची तब्येत आणखीनच खालावली त्यांना दम लागून छातीत त्रास होऊ लागल्याने त्यांना स्थानिक डॉक्टरांकडे उपचारासाठी नेले. डॉक्टरांनी त्यांना सिव्हिल हॉस्पिटल येथे उपचारासाठी न्यावे असे सांगितले. त्यावर दिंडीचे सूत्रसंचालक बाळासाहेब भाकरे, प्रकाश वाघ व राजेंद्र वारे यांनी खाजगी ॲम्बुलन्स मधून जिल्हा शासकीय रुग्णालयात २४ जून रोजी रात्री ९ वाजताच्या सुमारास उपचाराकरिता दाखल केले. तेथे उपचार सुरु असताना २५ जून रोजी दुपारी उपचारादरम्यान त्यांच्या मृत्यू झाला.

याप्रकरणी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉक्टर ओंकार शेंदुरकर यांच्या सांगण्यावरुन तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस हवालदार लबडे यांनी दिलेल्या माहितीवरुन नगर तालुका पोलीस ठाण्यात बी एन एस एस कलम १९४ प्रमाणे अकस्मात मृत्यूची नोंद केली. पुढील तजवीज पोलीस हवालदार खरमाळे हे करीत आहेत.

पुंडलिक आगवन हे गेली पंचवीस वर्षापासून कोपरगाव ते पंढरपूर असे दिंडी सोहळ्यात स्वतः च्या सायकल वरुन जातात. त्यांच्या या निधनाने दिंडीतील सर्व वारकऱ्यांमध्ये शोककळा पसरली. अशी दुर्दैवी घटना कोणत्याही वारकऱ्याबाबत घडू नये. यासाठी आम्ही परमेश्वराकडे प्रार्थना करु असे वारकऱ्यांनी यावेळी म्हटले.

पुंडलिक आगवन यांच्या पार्थिवावर कोपरगाव तालुक्यातील संवत्सर येथील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात दोन मुले, एक मुलगी, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

### श्रीधर खरपुडे यांचे निधन



नगर – केडगाव शास्त्रीनगर येथील रहिवासी श्रीधर मुरलीधर खरपुडे (वय ७०) यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्या मागे पत्नी, दोन मुले, तीन मुली, सुना, नातवंडे असा परिवार आहे. त्यांच्यावर केडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. श्रीधर खरपुडे हे बँक ऑफ इंडिया चे सेवानिवृत्त कर्मचारी होते.

### तात्या लगड यांचे अल्प आजाराने निधन

नगर – कल्याण रोडवरील शिवाजीनगर शितल कॉलनी येथील रहिवासी तात्या नामदेव लगड (वय ६९) यांचे २६ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले.



त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुले, सुना, ४ नातवंडे असा परिवार आहे.

### प्रा. डॉ. प्रकाश पोतदार यांचे हृदयविकाराने निधन



आष्टी – मुर्जदपूर आष्टी येथील रहिवासी प्रा. डॉ. प्रकाश मनोहर पोतदार (वय ५५) यांचे २६ जून रोजी हृदयविकाराने निधन झाले. त्यांच्यावर आष्टी स्मशानभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे पत्नी, मुलगा, भावजय असा परिवार आहे.

# इलेक्ट्रिक दुकान फोडून सर्व्हिस वायरसह रोख रकमेची चोरी

नगर – बंद दुकानाच्या शटरचे कुलूप तोडून चोरट्याने आत प्रवेश करुन सामानाची उचकापाचक केली. दुकानातील विविध साईजच्या सर्व्हिस वायरचे बंडल व रोख रक्कम असा १२ हजार २५० रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला. ही घटना भिंगारच्या आलमगीर रोडवरील द्वारकाधीश कॉलनी येथील इलेक्ट्रिक दुकानात २४ जून रोजी रात्री ९.३० ते २५ जून रोजी सकाळी ९ वाजण्याच्या सुमारास घडली.

याबाबत भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात मयूर बद्रीनाथ बेद्रे (वय ३३ रा. द्वारकाधीश कॉलनी, आलमगीर रोड, भिंगार) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की, फिर्यादी यांचे इलेक्ट्रिक दुकान त्यांनी २४ जून रोजी रात्री ९.३० वाजता नेहमीप्रमाणे बंद केले. बंद दुकानाचे शटरचे कुलूप तोडून चोरट्यांनी आत प्रवेश केला. सामानाची उचकापाचक करुन आतील ६ एमएम व ४ एमएमचा एक सर्व्हिस वायर बंडल, स्टील ग्रीप कंपनीचे सेलोटेपचे एक बंडल, दीड एम एमचा मल्टीगेल वायर बंडल व गल्लयातील ३ हजार रुपयांची रोकड असा १२ हजार २५० रुपये किमतीचा ऐवज चोरुन नेला.

याप्रकरणी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात मयूर बेद्रे यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन चोरट्याविरुद्ध बी एन एस कलम ३०३ (२) प्रमाणे घरफोडीचा गुन्हा दाखल केला. पुढील तपास पोलीस हवालदार व्ही. आर. गारुडकर हे करीत आहेत.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

# गृहिणी

## आरोग्य

### टोमॅटो खा, हृदयविकार टाळा

लाल-लाल टॉमॅटो सर्वांना खायला आवडतात. आंबट-गोड अशी यांची चव असते त्यात अनेक गुणधर्म असतात. टोमॅटोमुळे रक्त वाढते. जे लोक आपल्या आहारात टॉमॅटाचे जास्त सेवन करतात अशा व्यक्तींमध्ये हृदयविकार होण्याची शक्तता कमी असते. एका अध्ययन मध्ये असे आढळून आले आहे की, प्रौढावस्थामधील असून, अनेक लोकांना हृदयविकारचा झटका आला होता. टॉमॅटोमध्ये आढळून येणारा लायकोपीन पदार्थांचे आकलन केले आहे. लायकोपीन हे प्रभावशाली ऑक्सिकरण रुपात असल्यामुळे फ्री रेडिकल्स अत्याधिक प्रतिक्रियात्मक रेणू, जे रक्त प्रवाहमधील अन्य पदार्थानादेखील हानी पोहोचवू शकतात. उदाहरणार्थ प्रदूषणामुळे फुफ्फुसांचे अनेक आजार होऊ शकतात. तसेच हृदयविकार आणि कॉलेस्ट्रालपासून वाचण्यासाठी जास्त टॉमॅटो खा! आणि स्वस्थ राहा. जर कोणाच्या पोटात जंतांची समस्या असेल तर टोमॅटो कापून त्यात काळी मिरी मिसळा आणि सकाळी रिकाम्या पोटी खा. रोज असे केल्याने काही दिवसात विषारी कीटकांपासून सुटका होते. त्याचप्रमाणे दृष्टीही सुधारते.

## पाककला

### तिरंगा वॉटरमेलॉन

**साहित्य :** १ कप शेंगदाणे (भाजून सोलून), १/२ कप कंडेन्सड मिल्क, १/२ कप मिल्क पावडर, १/४ कप दूध किंवा गरजेनुसार, १ टिस्पून काळे तिळ, फुड कलर केशरी आणि हिरवा

**कृती :** काळे तिळ हलके भाजून घ्या. शेंगदाणे पल्स मोड वर फिरवून बारीक करा नंतर चाळून घ्या. नंतर त्यात मिल्क पावडर घाला, कंडेन्स मिल्क घाला व त्याचा गोळा मळायला सुरवात करा, दूध घालून गोळा मळून घ्यावा. आता त्या गोळ्याचे ३ भाग करा. पांढरा भाग तसाच ठेवा व उरलेल्या २ भागांपैकी एकात केशरी आणि एकात हिरवा रंग घाला (फुड कलर) व केशरी गोळ्यात काळे तिळ घाला व एकजीव करा. केशरी, पांढरा, हिरवा असे ३ रंग तयार आहेत. त्याचे समान भाग करून गोलाकार करून घ्या.

प्रथम ३ रंगाचे एक एक गोळा घ्या. हिरवा आणि पांढरा गोळा प्लास्टिक शीट वर लाटून घ्या. आता प्रथम केशरी गोळा घ्या तो पांढऱ्या पूरी मधे गुंडाळून परत गोल करा व नंतर हिरव्या गोळ्यात गुंडाळून पुन्हा गोलाकार करावे. तुमचे कलिंगड तयार आहे. उरलेले गोळे याच पद्धतीने करून घ्या. तयार गोळे १ तास फ्रिज मधे सेट व्हायला ठेवा. १ तासानंतर बाहेर काढा. नंतर एका गोळ्याचे ४ भाग करून तयार तिरंगा पिनट वॉटरमेलोन बर्फी सर्व्ह करा.

## वास्तू

✲ घराच्या उत्तर दिशेला पाण्याचा नळ लावू नका, यामुळे धनहानी होऊ शकते.

✲ ईशान्य दिशेला कचरा, स्वच्छतागृह, स्वयंपाकघर, जड लोखंडी वस्तू ठेवण्यास सक्त मनाई आहे. ते संपत्तीचा नाश करते, आणि दुर्दैव निर्माण करते.

✲ आठवड्यातून एकदा संपूर्ण घरात धुपाचा धूर करावा. यामुळे घर प्रसन्न राहील.

✲ गव्हामध्ये नागकेशराचे दोन दाणे आणि तुळशीची ११ पाने घालून ते दळून घ्यावे. हे शुभ मानले जाते.

## सल्ला

कणिक बनवताना त्यात थोडे दही घाला आणि कोमट पाण्याने पीठ मळा, तंदुरी चपाती मऊ आणि कुरकुरीत होईल.

## सौंदर्य

दररोज चेहऱ्यावर तिळाच्या किंवा बदाम च्या तेलाने मसाज केल्याने चेहऱ्यावरील रक्तपुरवठा चांगला होतो, आणि त्यामुळेच तुमची त्वचा तजेलदार आणि चमकदार दिसू लागते.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## दैनिक पंचांग

शुक्रवार, दि. २७ जून २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, आषाढ शुक्लपक्ष, पुनर्वसु ०७।२२, सूर्योदय ०६ वा. ३० मि. सूर्यास्त ०५ वा. ४१ मि.**

### राशिभविष्य

**मेष :** व्यवसायात एखाद्या अनोळखी व्यक्तीवर जास्त विश्वास ठेवू नका. अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते.

**वृषभ :** कामाच्या ठिकाणी तुमच्या वरिष्ठांमध्ये मतभेद निर्माण होऊ शकतात. किरकोळ दुखापत होऊ शकते. कोर्ट केसेसमध्ये चांगले वकिली करा.

**मिथुन :** आज जुन्या मित्राशी भेट होईल. प्रेमसंबंधांमध्ये जोडीदारावर संशय घ्याल. आज तुम्हाला एखादी चांगली बातमी मिळेल. त तुमच्या घरी एक दूरचा नातेवाईक येईल.

**कर्क :** तुम्हाला अतिशय महत्त्वाच्या कामात यश मिळेल. तुम्हाला स्वादिष्ट जेवण मिळेल.

**सिंह :** तुम्हाला लांबच्या प्रवासाला जावे लागू शकते. कामाच्या ठिकाणी तुमच्या वरिष्ठांशी जवळीक वाढेल.

**कन्या :** आज तुम्हाला काम करण्याची इच्छा होणार नाही. तुम्हाला पुन्हा पुन्हा काही अनुचित घटना घडण्याची भीती वाटेल.

**तूळ :** जवळच्या व्यक्तीकडून तुमच्या भावना दुखावल्या जाऊ शकतात. अपमान सहन करावा लागू शकतो.

**वृश्चिक :** आज आर्थिक स्थिती सुधारेल. संपत्ती आणि मालमत्ता वाढेल. जमीनीचा जुना वाद मिटेल.

**धनु :** तुमच्या व्यवसायात नवीन योजना किंवा योजना राबवू शकता. यामुळे तुमचा व्यवसाय जलद गतीने चालण्यास मदत होईल.


**मकर :** पशुपालनात गुंतलेल्या लोकांना चांगले उत्पन्न मिळेल. आज तुम्हाला तुमच्या सासरच्या लोकांकडून चांगली बातमी मिळेल.

**कुंभ :** बहुराष्ट्रीय कंपन्यांमध्ये काम करणाऱ्या लोकांना परदेशात जाण्याचे आमंत्रण मिळेल. प्रगतीसोबतच यश मिळेल.

**मीन :** नोकरीतील तुमच्या चांगल्या समर्पणाने तुमचा बॉस तुमचा पगार वाढवेल. विद्यार्थ्यांना अभ्यासाबाबत थोडी चिंता असेल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## फिल्मीचक्कर क्र. ११९४ सौ. शैलजा कुलकर्णी



**आडवे शब्द :-** १) नील गगनपे उडते बादल आ आ आ ++ + +++ + + हमारा कर दे तू छाया (गाणे) ५) ++ भतीजा (चित्रपटाचे नाव) ६) ++ का मौसम (चित्रपटाचे नाव) ८) एक +++ (चित्रपटाचे नाव) ९) जुन्या काळातील एक दिग्दर्शक - शक्ती +++ १२) नया ++ नयी रात (चित्रपटाचे नाव) १३) ++ यहां मरना यहां इसके सीवा जाना (गाणे) १५) ++ ++ गीता (चित्रपटाचे नाव) १७) शाहरूखखान, मनीषा कोईराला यांचा एक चित्रपट २०) सुनील दत्त, आशा पारेख, ललिता पवार, ओमप्रकाश यांचा एक चित्रपट

**उभे शब्द :-** २) सुनील शेट्टी, शिल्पा शिरोडकर; सैफ अलीखान, मधू यांचा एक चित्रपट ३) ++ ++ +++ होता है (आशा पारेख, देवानंद) ४) ++ खेल मे (चित्रपटाचे नाव) ७) +++ के रखवाले (चित्रपटाचे नाव) १०) दिल एक +++ (चित्रपटाचे नाव) ११) धर्मेंद्र, रेखा, मिथुन चक्रवर्ती, शक्ती कपूर यांचा एक चित्रपट १४) जुन्या काळातील एक दिवंगत अभिनेत्री १६) औरत +++ औरत (चित्रपटाचे नाव) १८) छोटी सी उमर मे ++ गया रोग कहते हैं लोग (गाणे) १९) ++ की आवाज (चित्रपटाचे नाव)

# ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲ मुलांचे विश्व ✲ ✲ ✲ ✲ ✲ ✲

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार :** जिंकण्याची मजा तेव्हाच येते, जेव्हा सर्वजण तुमच्या हरण्याची वाट पाहत असतात.

## मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

### कोणत्या रक्तगटाच्या लोकांना डास चावत नाहीत?

उन्हाळा येताच डासांची दहशत वाढते. पण तुम्ही कधी लक्षात घेतले आहे का की डास काही लोकांना जास्त चावतात आणि काहींना अजिबात चावत नाहीत? हो, हे खरे आहे.

या रक्तगटाच्या लोकांना डास अजिबात चावत नाही. तर डास विशिष्ट रक्तगटांकडे जास्त आकर्षित होतात. डास रक्तगट O असलेल्या लोकांना सर्वात जास्त चावतात. या रक्तगटाचे लोक कुठेही बसले तरी त्यांना डास खूप चावतात आणि त्या ठिकाणी लाल रंगाची खूण तयार होते. अशा लोकांना इतका त्रास होतो की ते डासांपासून बचाव करण्यासाठी अँटी-मॉस्किटो लोशन इत्यादींचा वापर करतात.

याशिवाय, डास जास्त चावण्याची काही इतर कारणे आहेत. खरं तर, डास मानवी शरीरातून बाहेर पडणारा वास, कार्बन डायऑक्साइड आणि त्वचेतील रसायने ओळखून त्यांचा शिकार निवडतात. O रक्तगट असलेल्या लोकांच्या शरीरातून बाहेर पडणारी रसायने डासांना सर्वात जास्त आकर्षित करतात. B रक्तगट असलेले लोक दुसऱ्या क्रमांकावर येतात, ज्यांना डास जास्त चावतात.

A रक्तगट असणाऱ्या लोकांना डास फार क्वचितच चावतात. जरी खूप जास्त डास असताना त्यांना थोडे चावले जाते, परंतु डास त्यांना इतरांपेक्षा कमी चावतात.

### वैजयंतीमाला

भौमासुर राक्षसाच्या वधानंतर त्याच्या पत्नीने श्रीकृष्णाला वैजयंतीमाला व इतर दिव्य वस्तू अर्पण केल्या. त्या वैजयंतीमालेच्या उत्पत्तीची ही कथा.

पूर्वी विष्णूच्या दाराशी जय आणि विजय असे सख्खे भाऊ दाखल होते. त्यांचा पिता सुशील हा नावाप्रमाणेच सदाचारी विष्णुभक्त होता. रोज त्याच्या घरचा नैवेद्य विष्णुलोकी जात असे. जय व विजय यांच्या पत्नी उत्कृष्ट स्वयंपाक करून दोघींपैकी एक तो नैवेद्य सुशीलजवळ आणून ठेवी. नैवेद्य समर्पण केल्यावर ते ताट आपोआप विष्णुलोकी जात असे. असे कित्येक वर्षे चालले होते. पण एकदा विजयची पत्नी जयंती हिने नैवेद्य दाखवण्यापूर्वी भाजीची चव बघितल्याने तो नैवेद्य विष्णुलोकी जाईना. सुशीलला जेव्हा खरी हकिगत कळली, तेव्हा रागाच्या भरात त्याने जयंतीला तू शिळा होऊन पडशील अशा शाप दिला. राग शांत झाल्यावर तिची दया येऊन श्रीहरीचा हात लागताच तुझा उद्धार होईल असा उःशाप दिला.

त्याप्रमाणे जयंती मेरुपर्वताच्या माथ्यावर सिद्धसरोवरात शिळा होऊन पडली. जयंतीच्या विरहाने वेडा होऊन विजयही त्या सरोवराकाठी सूर्याचे अनुष्ठान करीत बसला. एके दिवशी त्याच्यापुढे एक सुंदर असे कमलपुष्प येऊन पडले. ते दिव्य कमळ शेषांनी सूर्याला अर्पण केलेल्यांपैकी होते. त्याला पाहून विजयला जयंतीची जास्त तीव्रतेने आठवण होऊन त्याने ते कमळ त्या शिलारूपी जयंतीस वाहिले. याप्रमाणे सूर्याकडून मिळालेली एकशेआठ कमळे त्याने त्या शिळेवर वाहिली. त्या एकशेआठ सुवर्णकमळांची त्याने माला गुंफली.

इकडे सर्व देवांच्या आग्रहाखातर भगवान विष्णू शंकरांकडे जात असता, वाटेत सिद्धसरोवरापाशी थांबले. ती सुवर्णकमळांची माला त्यांना फारच आवडली व त्यांनी ती शिळेवरुन उचलली. माला उचलताना शिळेस हात लागून जयंती पूर्वरूपात आली. मग विजय व जयंती यांना आशीर्वाद देऊन त्या दोघांचे स्मृतिचिन्ह म्हणून विष्णूने ती माला गळ्यात धारण केली. विजय व जयंती या नावांवरुन तिचे नाव वैजयंती असे ठेवले व आपल्या भक्ताची स्मृती म्हणून गळ्यात वागवले.

## जीवन का अमृत (भाग १)



हम प्रभु का उसकी दया के लिए धन्यवाद करें और बदले में अपने बहन-भाइयों को, उनकी, सांसारिक और रूहानी जरूरतों में सहायता करें। अगर कुछ लोग ऐसे हैं, जो सचाई को नहीं समझते, या समझना नहीं चाहते, तो हम उनसे क्रोधित न हों। वे भी हमारी तरह प्रभु की संतान हैं और उन्हें प्रेम से और विश्वास दिलाकर ही जीतना होगा। हम सभी प्रभु के बगीचे में मजदूर है।

मैं, प्रेम से, और अहम् को, त्याग कर की गई, आपकी सेवाओं की कद्र करता हूँ। प्रेम महापुरुषों का सर्वोपरि नियम है। प्रेम त्याग और सेवा माँगता है। जो लोग प्रेम की वेदी पर अपनी जिंदगी त्याग देते हैं, वे अनंत परमानंद और शांति का वरदान पाते हैं। प्रेम, प्रेम से पैदा होता है। दयावान गुरु-शक्ति के प्रति प्रेम से भरी भक्ति और विश्वास महापुरुषों की पवित्र शिक्षाओं का सार रहे हैं।

### सामाजिक आचरण और नैतिक जीवन

प्रेम की पवित्र दात पाने के लिए आपका विनम्र होकर प्रार्थना करना शुभ है। ऐसी विनम्र प्रार्थना अवश्य ही पूरी होगी और आपको प्रेम की बेशकीमत दात का आशीर्वाद मिलेगा।

प्रेम की भावना हर एक के दिल में छुपी हुई है। यह आत्मा में जन्मजात है और सतुरु जाने के बाद यह तीव्र हो जाती है। यह से जुड़ दिव्य नियम की परिपूर्णता है, समाप्ति है। यह शुद्ध कर देने वाली एक सकारात्मक शक्ति है, जिसे एक कामिल सतुरु की देखरेख में काबू कर लेने पर पूर्ण मोक्ष और आत्मा की मुक्ति मिलना पक्का हो जाता है। यह इसी जमीनी जिंदगी में, सतुरु की दया से, मुक्ति दिला देती है। यह दयालुता की अभिव्यक्ति है, बिना किसी इनाम या बदले में कुछ पाने के।

मैं आपमें, एक दूसरे के प्रति प्रेम और विश्वास की भावना देखकर और सतुरु के पवित्र उद्देश्य के लिए एक साथ कंधे से कंधे मिलाकर काम करता देखकर प्रसन्न होऊँगा। सतुरु के महान उद्देश्य के लए कोई भी प्यार भरी कुर्बानी बड़ी नहीं। हमारे कार्य इसी सिद्धान्त पर आधारित होने चाहिएँ ।

प्रेम, प्रेम से उत्पन्न होता है, और प्रेम हर वस्तु को सुशोभित कर देता है। यह दिव्य गुण, जब विकसित हो जाता है, तो शांति और समन्वय के लिए निर्विघ्न कार्य करता है और एक दूसरे को समझने में सहायक होता है। मुझे आप सबसे प्रेम है। मैं चाहता हूँ कि सभी भाई-बहन अधिक शांति से रहें तथा एक दूसरे की सहायता करें। हम सभी एक ही उद्देश्य के लिए कार्य कर रहे हैं और हम अपने सभी कार्यों में प्रेम के धागे बुने, ताकि और लोग भी हमारी आदर्श जिंदगी से आकर्षित हो। जब कोई आत्मनिरीक्षण के द्वारा सत्य का एक सिरा जोर से पकड़ लेता है, उदाहरण के लिए, शब्द को हर जगह, हर समय निरंतर सुनता तो उसे सचाई के रास्ते का दृढ़-विश्वास हो जाता है।

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

## अंतरिक बल (भाग - २)

और SH K.C. LPSH ने अपनी बुक '१०० करोड़ का एक मोती' में पेज ४२ पर लिखा है कि 'एक सेकेन्ड के हजारवें अंश के समय में आत्मा पृथ्वीलोक से करोड़ों मील दूर ट्राजिट लोक में पहुंचती है और उतने ही समय में वह पृथ्वी पर वापिस पहुँच जाती है।

मन सूर्य तत्व से बना है। तथा सूर्य प्रकाश की गति ३ लाख किलोमीटर प्रति सेकेंड है और हमारा मन भगवान के पास एक सेकेंड के हजारवे हिस्से में पहुँच जाता है अर्थात भगवान ३००० (३ लाख गुना १०००) लाख किलोमीटर मीटर दूर है अर्थात मन की गति ३००० लाख किलो मीटर अर्थात ३० करोड़ किलोमीटर प्रति सेकेंड है। हम कह सकते हैं कि परमधाम जहां भगवान रहते हैं पृथ्वी लोक से ३० करोड़ किलोमीटर दूर है। यही मन की गति है। हमारे मन में जो भी विचार उठते हैं वह ३० करोड़ किलोमीटर तक अपने कम्पन फैलाता रहता है। जो कोई भी इस की धारा के सामने आयेगा यह उसे प्रभावित करेगा। इस समय आप के मन में जो विचार चल रहे हैं, उन्हे चेक करो, आप के ये विचार ३० करोड़ किलोमीटर तक कम्पन कर रहे हैं और जो भी व्यक्ति इस आवर्ती पर है वह आप के विचार सुन रहा है और उसी अनुसार प्रतिक्रिया करेगा। हरेक मनुष्य जो हर पल संकल्प कर रहा है उसका प्रभाव आकाश में जा रहा है और उसकी क्रिया और प्रतिक्रिया हो रही है, उसी अनुसार संसार में दुःख या सुख बढ़ रहा है।

### आज्ञा चक्र

मन की गति तीव्र होने के कारण, जब हम बाबा (भगवान) को याद करते हैं तो याद करने से पहले, जैसे ही हमें भगवान के बारे ख्याल आता है, हमारा भगवान से उसी क्षण एनर्जी (मानसिक) सम्पर्क हो जाता है। इस लिये यह नहीं कहो की मेरा योग नहीं लगता । हां अनुभूति होने में समय लगता है क्योंकि विचार एक निश्चत संख्या के बाद ही बल में परिवर्तित होता है। प्रत्येक मनुष्य जो भी विचार कर रहा है वह सारे ब्रह्मांड को प्रभावित कर रहा है। इसलिये हमें अपने विचारों पर ध्यान रखने की सख्त जरूरत है।

आज्ञा चक्र -२४-मन का कवनटम रुप

सूक्ष्म स्थूल से शक्तिशाली होता है। पृथ्वी स्थूल है। पृथ्वी से जल सूक्ष्म है। जल से अग्नि सूक्ष्म है। अग्नि से वायु सूक्ष्म है। वायु से सूक्ष्म आकाश है। आकाश में चुम्बकीय शक्ति, विद्युत शक्ति और ईथर जैसी महान सूक्ष्म शक्तिया हैं। बर्फ स्थूल है। पानी बर्फ से सूक्ष्म है। पानी से सूक्ष्म भाप है। भाप से सूक्ष्म हाइड्रोजन और आक्सीजन हैं। हाइड्रोजन से जब हाईड्रोजन बम बनाया जाता है तो वह महा शक्तिशाली होता है जिस से आज सारा संसार विनाश के कगार पर खड़ा है। शरीर और हड्डियां मन का स्थूल रुप हैं। नस नाड़िया शरीर से सूक्ष्म हैं। नस नाड़ियों से कोशिकायें सूक्ष्म होती हैं। कोशिकाओं से सूक्ष्म खून होता है। खून से सूक्ष्म ओज होता है। ओज से सूक्ष्म

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

## हसा आणि शतायुषी व्हा!

**ग्राहक :** दोरीच्या उड्या आहेत का?

**पुणेरी दुकानदार :** इथे फक्त दोरी मिळेल उड्या ज्याने त्याने आपापल्या मारायच्या आहेत.

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

✲ वर्ल्ड हिंदू इकॉनॉमी परिषदेचे आयोजन कोठे करण्यात आले आहे?

– मुंबई

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

तिचे आजोबा तर सांगेल ती वस्तू तिला लगेचच आणून देत असल्यामुळे ती असा हट्ट करते. वेफर्स, चॉकलेट, बिस्किटस् अशा खाण्यामुळे बघा तिचे दात किती किडले आहेत. त्यामुळे मी तिला चॉकलेट घेत नाही. आजी-आजोबांच्या लाडामुळे ती माझ्या डोक्यावर बसली आहे.'' तेव्हा मी तिला म्हणाले, ''अगं, तू समजावून सांग लाडामुळे ती माझ्या डोक्यावर बसली आहे.'' तेव्हा मी तिला म्हणाले, ''अगं, तू समजावून सांग ना त्यांना, की तिच्या आरोग्यासाठी असं खाणं चांगलं नाही.'' तर ती मला म्हणाली, ''माझं कोण एकतयं मॅडम. ते मला म्हणतात, ''आमच्या समोर मुलांना अजिबात रडवायचं नाही. दिवसभर तू नोकरीसाठी बाहेर जाते आणि तिला आम्हालाच सांभाळावं लागतं. आईविना लेकरू सांभाळताना तिच्या कलाकलानं घेताना चॉकलेट, बिस्किटं द्यावीच लागतात. नाहीतर ती थयथयाट करते.''

श्रेयासारखी मुले आपण अनेक कुटुंबांमध्ये बघतो. आई अर्थार्जनासाठी घराबाहेर पडायला लागली, तसा मुलांच्या संगोपनाचा विषय गंभीर होत चालला. अशा वेळी अनेकजण पाळणाघराचा पर्याय निवडतात. तर काहीजण आळीपाळीने मुलांजवळ थांबतात. तर अनेक वेळा कधी आजी-आजोबा हे काम आनंदाने स्वतःहून स्वीकारतात. कारण ते जेव्हा आई-बाबा असतात, त्या वेळी स्वतःच्या करीअरसाठी धावताना मुलांचे बालपण आनंदाने जगायचे, उपभोगायचे राहून गेलेले असते. म्हणून पुन्हा नातवंडांच्या रुपात आजी-आजोबांना अपत्यप्राप्तीचा आनंद होऊन आकाश ठेंगणे होते.

### आजी-आजोबांची साथ

परंतु आजी-आजोबांची पिढी आणि नवीन पिढी यांचे सूर जुळायला कधीकधी वेळ लागतो आणि यामध्येच नातवंडांचे नुकसान होऊ शकते. खरेतर आजी-आजोबा यांच्या सान्निध्यात बालपणीचा काळ जाणे यासारखे दुसरे सुख व आनंदाची गोष्ट मुलांसाठी असूच शकत नाही. कारण आजी-आजोबांकडून मुलांना अनेक चांगल्या अमूल्य गोष्टी शिकायला मिळतात. फक्त हे सर्व संगोपन आनंददायी होण्यासाठी कुटंबातील सर्व सदस्यांनी एकत्र येऊन काही शिस्त व नियम ठरवून घ्यावेत, की ज्यामुळे आजी-आजोबांनाही अतिरिक्त कामाचा ताण वाटणार नाही. १. आजी-आजोबांचे या वयात गुडघे, कंबर दुख शकते. अशा वेळी नातवंडांच्या मागे धावपळ करायला जमणार नसेल, तर तसे मुलगा व सुनेला स्पष्ट सांगून एखाद्या मदतनीसाची मदत घेऊन आम्ही मुलाचा सांभाळ करू असे सांगावे. मदतनीसाची मदत घेऊन नातवंडांना सांभाळले, तरी खूप मोठा भार हलका होतो. कारण मदतनीस फक्त काम करेल, परंतु प्रेम, माया, आपुलकी व

**(क्रमशः)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत शहरात ५०० सदनिकांची घरकुल योजना राबवणार

## काटवन खंडोबा परिसरात प्रकल्पासाठी अहवाल शासनाकडे पाठवणार : आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे

नगर – नागरिकांना परवडणाऱ्या दरात घरकुल मिळावे, यासाठी केंद्र शासनाच्या पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत महानगरपालिकेमार्फत शहरात ५०० सदनिकांचा घरकूल प्रकल्प राबवण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी दिली. या घरकुल योजनेसाठी प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, तो शासनाकडे मंजुरीसाठी पाठवण्यात येणार आहे. तसेच, वैयक्तिक जागेवर घरकुल बांधण्यासाठी २०० अर्ज दाखल झाले आहेत. त्यातील ५५ घरकुलांचा प्रकल्प अहवाल मंजुरीसाठी पाठवण्यात आल्याची माहितीही त्यांनी दिली.



काटवन खंडोबा परिसरात महानगरपालिकेच्या जागेत हा प्रकल्प उभारण्यात येणार आहे. एका सदनिकेची किंमत सुमारे १५ लाख रुपये इतकी असून, ३०० चौरस फुटांची सदनिका उपलब्ध करून देण्यात येणार आहे. तसेच, संकुलाच्या आवारात कम्युनिटी हॉलसह इतर सुविधाही दिल्या जाणार आहेत. या घरकुलांसाठी महानगरपालिकेकडे ७६० अर्ज प्राप्त झाले आहेत. त्याची छाननी सुरू आहे. घरकुलाचा प्रकल्प अहवाल तयार करण्यात आला असून, तो शासनाकडे पाठवण्यात येणार आहे. लाभार्थ्यांची निवड झाल्यानंतर किमान १ लाख रुपये भरून नोंदणी करून घेतली जाणार आहे. या माध्यमातून नागरिकांना परवडणाऱ्या दरात स्वतःचे हक्काचे घर मिळणार असल्याचे यशवंत डांगे यांनी सांगितले.

तसेच, वैयक्तिक जागेवर घरकुल बांधण्यासाठीही पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत सुमारे अडीच लाख रुपयांचे अनुदान तीन टप्प्यात दिले जाते. त्यासाठी २०० अर्ज दाखल झाले आहेत. ५५ घरकुलांचा प्रकल्प अहवाल शासनाकडे पाठवण्यात आला आहे. त्याला मंजुरी मिळाल्यानंतर पहिल्या टप्प्यातील अनुदान लाभार्थ्याला मिळणार आहे.

घरकुल योजनेबाबत व्यापक जनजागृती करण्यासाठी महानगरपालिकेकडून विविध कंपन्या, शाळा, मोठ्या व्यावसायिक आस्थापना अशा विविध ठिकाणी माहिती देण्यासाठी कार्यशाळा घेतल्या जात आहेत. अधिकाधिक नागरिकांपर्यंत या योजनेची माहिती पोहचवण्याचे प्रयत्न आहेत. इच्छुकांनी अर्ज करण्यासाठी महानगरपालिकेच्या प्रकल्प विभागात संपर्क साधावा, असे आवाहन यशवंत डांगे यांनी केले आहे.



वडगाव गुप्ता येथे स्वाभिमानी सोशल फाउंडेशन, श्री हनुमान सेवा भक्त मंडळ आणि वरद नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर आणि अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले.

# 'आरोग्य हेच खरे संपत्तीचं साधन'

## श्यामराव पिंपळे यांचे प्रतिपादन; वडगाव गुप्ता येथे मोफत नेत्र तपासणी शिबिर उत्साहात

नगर – ग्रामीण भागात अजूनही आरोग्यविषयक मूलभूत सुविधा कमी प्रमाणात पोहोचत आहेत. अशा वेळी अशा प्रकारची मोफत तपासणी शिबिरे म्हणजे खऱ्या अर्थाने समाजसेवेचे उदाहरण आहे. डोळ्यांची तपासणी आणि आवश्यक शस्त्रक्रिया अल्प दरात किंवा मोफत करून देणे ही एक मोठी सामाजिक जबाबदारीची भावना आहे. ग्रामीण रुग्णांचे दु:ख समजून घेतले पाहिजे, आणि अशा योजनांतून त्यांना दिलासा मिळतो. आरोग्य हीच खरी संपत्ती असून, ती जपण्यासाठी प्रत्येकाने सजग राहिले पाहिजे, असे प्रतिपादन श्यामराव पिंपळे यांनी केले.

नगर तालुक्यातील वडगाव गुप्ता येथे स्वाभिमानी सोशल फाउंडेशन, श्री हनुमान सेवा भक्त मंडळ आणि वरद नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिर आणि अल्प दरात मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिराचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमाचा प्रारंभ छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून व दीप प्रज्वलनाने झाला. या वेळी नेत्रतज्ज्ञ डॉ. रावसाहेब बोरुडे आणि डॉ. स्मिता पटारे यांचा सत्कार करण्यात आला.

शिबिरात संगणकीकृत नेत्र तपासणी करण्यात आली. मोतीबिंदू व काचबिंदूच्या रुग्णांना तज्ज्ञ मार्गदर्शन देण्यात आले. शासनाच्या आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना व महात्मा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत रेटिना, काचबिंदू, नेत्ररोपण, लेझर, इंजेक्शन इत्यादी शस्त्रक्रिया मोफत उपलब्ध असल्याची माहिती देण्यात आली.

या शिबिरात वडगाव गुप्ता तसेच पंचक्रोशीतील २५४ रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. शिबिरास श्यामराव पिंपळे, बाबासाहेब डोंगरे, जालिंदर पाटील डोंगरे, गणेश आबासाहेब डोंगरे, गोरक शेवाळे, हौसराव ढोबळे, नाना शेवाळे, सुजित डोंगरे, भाऊ शेवाळे, नानासाहेब डोंगरे, सखाराम शिंदे, विठ्ठल डोंगरे, शेवाळे सर, उमेश डोंगरे, अंकुश नवले, भाऊ जरे, दिलीप सातपुते, संजय ढेपे, नामदेव शेवाळे, नंदू शेवाळे (पोलीस पाटील), पवार सर, किसन गीते, नामदेव गव्हाणे, विठ्ठल डोंगरे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी उपस्थित ग्रामस्थांनी डॉक्टरांचे व आयोजकांचे आभार मानले.

# गोदाम बांधकाम घटकासाठी २७ जूनपर्यंत अर्ज सादर करा

नगर – राष्ट्रीय खाद्यतेल अभियान तेलबिया योजनेंतर्गत जिल्हयात अनुदानावर गोदाम बांधकाम घटकासाठी अनुदान देण्यात येणार असून शेतकरी उत्पादक कंपन्यांनी गोदाम बांधकाम उभारणीसाठी २७ जून पर्यंत संबंधित तालुका कृषि अधिकारी कार्यालयास आवश्यक कागदपत्रासह अर्ज सादर करण्याचे जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी सुधाकर बोराळे यांनी केले आहे.

जिल्ह्यासाठी २५० मे. टन गोदाम बांधकामासाठी राष्ट्रीय खाद्यतेल अभियान-तेलबिया योजनंतर्गत एक गोदाम बांधकामाचे भौतिक उद्दिष्ट प्राप्त आहे. प्रत्यक्ष झालेल्या बांधकामाच्या ५० टक्के किंवा १२ लाख ५० हजार रुपये जे कमी असेल अशी अनुदान मर्यादा निश्चित करणेत आलेली आहे.

सदर बाब ही बँक कर्जाशी निगडीत असल्याने अर्जदारांनी प्रस्ताव सादर करताना केंद्र शासनाच्या SMART/वखार महामंडळ यांचे मार्गदर्शक सूचनांनुसार राष्ट्रीयकृत बँकेकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. बँकने कर्ज मंजुर केल्यानंतर संबधित अर्जदार कंपनी सदर बाबीचा लाभ घेण्यास पात्र राहील. इच्छुक लाभार्थी यांनी अर्ज करताना महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाच्या प्राधिकृत अधिकारी अथवा सार्वजनिक बांधकाम विभागाच्या मान्यता प्राप्त डिझाइन्स, स्पेसिफिकेशन्स व खर्चाच्या अंदाजपत्राकासह अर्ज तालुका कृषि अधिकारी यांचेकडे सादर करावा. शेतकरी उत्पादक कंपनी यांनी सभासद यादी सादर करणे आवश्यक आहे.

शेतकरी उत्पादक कंपनी यांचे मागील वर्षाचे ऑडीट रिर्पोट सादर करणे आवश्यक आहे. शेतकरी उत्पादक कंपनी यांचे ७/१२, ८ अ सादर करणे आवश्यक असल्याचेही कळविण्यात आले आहे.

# चौपाटी कारंजा चौकात रंगला संतकवी महिपती महाराजांच्या दिंडीचा स्वागत व गोल रिंगण सोहळा

नगर – चितळे रोड येथील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात चौपाटी कारंजा मित्र मंडळ ट्रस्टच्या वतीने सालाबाद प्रमाणे ताहाराबाद, ता. राहुरी येथील श्री संतकवी महिपती महाराज दिंडीचे भक्तिपूर्ण वातवरणात विठूनामाच्या जयघोषात स्वागत करण्यात आले. यानिमित्त चौकात आकर्षक सजावट करून राम, कृष्ण व हरी तसेच पांडुरंग रुक्मिणी व अहिल्यादेवी होळकर यांच्या मुर्त्यांचा देखावा उभारून आकर्षक सजावट करण्यात आली होती. बुधवारी सायंकाळी चौकात दिंडीचे आगमन झाल्यावर वारकऱ्यांनी गोल रिंगण केले. टाळ पखवाजाच्या व हलगीच्या तालात या रिंगणास सुरवात झाली. यावेळी भगवे झेंडेकरी, दिंडीतील अश्व रिंगणात दौडले. सुमारे तास भर चाललेले हे रिंगण याची देही याची डोळा रांगण पाहून उपस्थित नगरकर सुखावले.



चौपाटी कारंजा मित्र मंडळ ट्रस्टच्यावतीने ताहाराबाद येथील श्री संतकवी महिपती महाराज दिंडीचे भक्तिभावाने स्वागत झाल्यावर येथे दिंडीतील वारकऱ्यांचे व महिला मंडळाचे गोल रिंगण रंगले. यावेळी चौकात आध्यात्मिक देखावा उभारण्यात आला होता.

श्री संतकवी महिपती महाराज दिंडीचे आगमन झाल्यावर ट्रस्टच्यावतीने फटाक्यांची आतिषबाजी करत रथावर व वारकऱ्यांवर जेसीबी मधून पुष्पवृष्टी तसेच पेपर ब्लास्ट करून दिंडीचे स्वागत करण्यात आले. स्वागताने वारकऱ्यांनी थकवा विसरून लगचेच गोल रिंगण धरले. टाळ पखवाजाच्या तालात वारकऱ्यांसह उपस्थित नागरिक व मंडळाचे पदाधिकारी, महिला या रिंगणात सहभागी झाले. रिंगण सोहळ्यानंतर मंडळाच्या महिला सदस्यांनी माउली माउली या गाण्यावर आपले सादरीकरण करून बाल पांडूरंग व रुक्मिणी भवती रिंगण केले.

यावेळी पालखीचे ट्रस्टच्या पदाधिकाऱ्यांनी विधिवत पूजा करून दिंडी चालक अर्जुन महाराज तनपुरे यांचा सत्कार केला. यावेळी मंडळाचे अध्यक्ष महेश कुलकर्णी, मंडळाचे सचिव अमोल भंडारे, उपाध्यक्ष सूचित भळगट, विश्वस्त महेंद्र तापकिरे, कैलास गहिले, गणेश सुद्रिक, सुरेंद्र सोनवणे, नरेंद्र सोनवणे, अरविंद मुनगेल, सागर रोहोकले, मयूर कुलकर्णी, तेजस वैद्य, प्रदिप बोज्ञा, महेन दिवाणे, परेश भंडारे, मनीष भंडारे, नाना भागानगरे, उमेश भोसले, तेजस वैद्य, अर्णव नगरकर, आर्यन दिवाणे, पुरुषोत्तम बुरसे, अक्रम पठाण, मनिष भंडारे, अ‍ॅड.पराग देशमुख, राहुल वरखेडकर, महिला सदस्या ज्योती दांडगे, निनाद ढोरे, सपना भळगट, दिपाली भळगट, नंदा देवतरसे, सुप्रिया येंडे, सुषमा वरखेडकर, शीतल रोहकले, प्राजक्ता भांडारे आदींनी वारकऱ्यांची निवास व भोजनासह सर्व सोयीसुविधा उपलब्ध करून दिल्या.



अहमदनगर सीए शाखा, पतंजली योग समिती व नक्षत्र प्राणायाम ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने नक्षत्र लॉन्स, बुरूडगाव रोड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहाने साजरा करण्यात आला

# अहमदनगर सीए शाखेतर्फे योग दिन साजरा

नगर – अहमदनगर सीए शाखा, पतंजली योग समिती व नक्षत्र प्राणायाम ग्रुप यांच्या संयुक्त विद्यमाने नक्षत्र लॉन्स, बुरूडगाव रोड येथे आंतरराष्ट्रीय योग दिन उत्साहाने साजरा करण्यात आला. सकाळी ६ ते ८ ह्या वेळेत चाललेल्या योग शिबिरात पतंजली योग समितीचे श्रीमती कल्पना ठोकळ यांनी मार्गदर्शन केले. गेल्या १० ते १२ वर्षांपासून सातत्याने त्यांचे योग शिबिरात योगदान आहे. यावेळी त्यांनी विविध योगासनांचे प्रात्यक्षिक करून उपस्थितांना योगाचे शास्त्रशुद्ध ज्ञान दिले. योगाच्या महत्त्वावर भाष्य करताना ठोकळ म्हणाल्या, योग ही केवळ शारीरिक व्यायामाची प्रक्रिया नसून मानसिक शांतीसाठीही अत्यंत उपयुक्त साधन आहे.

तसेच सीए संस्थेचे प्रेसिडेंट सीए चरणजोतसिंग नंदा व व्हाईस प्रेसिडेंट सीए प्रसन्नकुमार यांनी वीडिओ द्वारे दिलेल्या संदेशाचे प्रक्षेपण यावेळी करण्यात आले.

सुरुवातीला अहमदनगर सीए शाखेचे अध्यक्ष सीए प्रसाद पुराणिक यांनी स्वागत केले. यावेळी बोलताना ते म्हणाले की, दैनंदिन धावपळीत आपण आरोग्याकडे दुर्लक्ष करतो, पण योगाचे नियमित सरावाने मानसिक आणि शारीरिक आरोग्य राखणे शक्य होते. ही संस्कृती प्रत्येकाने अंगिकारली पाहिजे.

माजी महापौर भगवान फुलसौंदर यांनी यावेळेस मनोगत व्यक्त केले. ते म्हणाले, योग ही भारतीय संस्कृतीची अमूल्य देणगी आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनात प्रत्येक नागरिकाने योगाचा अंगीकार करणे अत्यावश्यक आहे. या माध्यमातून शरीर आणि मनाचे स्वास्थ्य जपता येते.

उपाध्यक्ष सीए अभयकुमार कटारिया यांनी आभार मानले. शिबिरासाठी सीए महेश तिवारी, सीए महेश भळगट, सीए सुनंदा रच्चा, सीए चैन्सी आगरवाल, माजी अध्यक्ष सीए मोहन बरमेचा व इतर सीए सभासद, तसेच विकासाचे विद्यार्थी व परिसरातील नागरिक उपस्थित होते.

## महामंडळाच्या थेट कर्ज योजनेचा लाभ घ्यावा

नगर – वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ अंतर्गत पैलवान कै. मारुती चव्हाण वडार आर्थिक विकास महामंडळ, राजे उमाजी नाईक आर्थिक विकास महामंडळ व वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ, अहिल्यानगर यांच्यामार्फत एक लाख रुपये थेट कर्ज योजना राबविण्यात येत असून विमुक्त जाती व भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील व्यक्तींनी या योजनेचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा व्यवस्थापक आर. एस. नरवडे यांनी केले आहे.

सन २०२४-२०२५ या आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट प्राप्त झाले असून एक लाख रुपये थेट कर्ज योजनेमध्ये संपूर्ण कर्ज महामंडळाकडून दिले जाणार आहे. २ हजार ८५ रुपयांच्या नियमित ४८ समान मासिक हप्त्यामध्ये परतफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज अदा करावे लागणार नाही. परंतु थकीत हप्त्यावर द.सा.द.शे. ४ टक्के व्याजदर आकारण्यात येईल. अधिक माहितीसाठी वसंतराव नाईक विमुक्त जाती व भटक्या जमाती विकास महामंडळ (मर्या.) डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, सावेडी नाका, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर दुरध्वनी क्र. ०२४१-२९७०७०० येथे संपर्क साधावा.

## महानगरपालिका कामगार युनियनची २७ जूनला वार्षिक सर्वसाधारण सभा

नगर – अहिल्यानगर महानगरपालिका कामगार युनियनची २७ जून रोजी दुपारी ४ वाजता वार्षिक सर्वसाधारण सभा राजमाता जिजाऊ सभागृह, महानगरपालिका येथे आमदार संग्राम जगताप यांच्या प्रमुख उपस्थितीत व युनियनचे अध्यक्ष जितेंद्र सारसर यांच्या अध्यक्षतेखाली होणार आहे. सभासदांनी उपस्थित राहावे, असे आवाहन सरचिटणीस आनंद वायकर यांनी केले.



प्रयत्न नर्सिंग कॉलेज अहिल्यानगर येथे जागतिक योगदिवस साजरा करण्यात आला. (छाया – समीर मन्यार)

## शैक्षणिक विकासासाठी दैनंदिन जीवनात योगाचा अंतर्भाव आवश्यक

### मयूर कांगणे यांचे प्रतिपादन

नगर – विद्यार्थ्यांच्या स्वतःच्या शैक्षणिक विकासासाठी दैनंदिन जीवनात योगाचा अंतर्भाव करणे आवश्यक असे प्रतिपादन प्रयत्न नर्सिंग कॉलेज येथे जागतिक योगदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात योगगुरु मयूर कांगणे यांनी केले.

प्रयत्न नर्सिंग कॉलेज येथे योगदिवस साजरा करण्यात आला. या प्रसंगी मयूर कांगणे यांनी विद्यार्थ्यांना शारीरिक व बौद्धिक विकासासाठी आवश्यक अशी योगासने व प्राणायम याचे प्रात्यक्षिक दाखवून प्रशिक्षण दिले. यानंतर मुलांशी सवांद साधून योगासनांसंबंधी मार्गदर्शन करून नियमित योगसाधना करण्याचे आवाहन केले.

याप्रसंगी प्राचार्य दिक्षा घाटविसावे, प्रशासक मीना लाड, उपप्राचार्य स्मिता तडके, नर्सिंग ट्यूटर प्रियंका पठारे, निलेश दवणे, अमोल गमरे, गितांजली गायकवाड, प्रतीक पाटोळे, शिल्पा गमरे, शितल लोंढे, गणेश दातीर, नम्रता शिंदे, मीराबाई सुरवासे, मृणालिनी जाधव, पौर्णिमा वाघ, अर्पिता पांचाळ, निर्मला राठोड आदींसह शिक्षक व कर्मचारी उपस्थित होते.

# आणीबाणी बंदिवान चित्रप्रदर्शनास प्रतिसाद

नगर – आणीबाणी लागू होऊन ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जिल्हा प्रशासन व जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित चित्र प्रदर्शनाचे उद्घाटन निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गीते यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील तळमजल्यावर आयोजित या प्रदर्शनास आणीबाणी बंदिवान, त्यांचे नातेवाईक व नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.



आणीबाणी लागू होऊन ५० वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने जिल्हा प्रशासन व जिल्हा माहिती कार्यालयाच्यावतीने आयोजित चित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते ते पाहण्यासाठी झालेली गर्दी.

देशात २५ जून १९७५ रोजी आणीबाणी लागू करण्यात आली होती. या घटनेला २५ जून २०२५ रोजी ५० वर्ष पूर्ण झाली. त्यानिमित्ताने जिल्ह्यातील आणीबाणी बंदिवानांच्या कार्याला उजाळा देण्यासाठी सचित्र प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले होते. यात आणीबाणीच्या अनुषंगाने जिल्ह्यात घडलेल्या विविध घटना-घडामोडींची तसेच आणीबाणीविरोधी संघर्षात सहभागी झालेल्या विविध कार्यकर्ते-नागरिकांची छायाचित्रे व माहितीचा समावेश करण्यात आला होता. जिल्ह्यात सध्या आणीबाणी बंदिवान व त्यांच्या पत्नी अशा एकूण १३३ जणांना शासनाकडून मानधन दिले जात आहे. यापैकी ४५ जणांकडून उपलब्ध माहिती या प्रदर्शनात मांडण्यात आली होती.

प्रदर्शनातून आणीबाणीच्या कालावधीतील संपूर्ण संघर्ष आणि त्याचे विविध पैलू प्रभावीपणे सादर करण्यात आल्यामुळे बंदिवास भोगलेल्या अनेक कार्यकर्त्यांनी समाधान व्यक्त केले व शासनाचे आभार मानले.

आणीबाणीच्या काळात जिल्ह्यातील अनेक बंदिवासी १ महिन्यापासून ते १९ महिन्यापर्यंतच्या कारावास भोगला. या सर्व बंदिवासांच्या कार्याला प्रदर्शनातील विविध फ्लेक्स, बोर्ड व स्टँडी यांच्या माध्यमातून उजाळा देण्यात आला होता. प्रदर्शनाच्या मध्यवर्ती ठिकाणी ठेवलेला सेल्फी पॉईंट अनेकांच्या आकर्षणाचा केंद्रबिंदू ठरला.

प्रदर्शनाच्या उद्घाटनप्रसंगी हेरंब आवटी, रविंद्र कुलकर्णी, अविनाश आपटे, सुरेश बब, सुभाष कोते, बाबूराव पुरोहीत, विजयराव जोशी असे अनेक ज्येष्ठ स्वयंसेवक उपस्थित होते. प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील यांनी प्रदर्शनाच्या संकल्पनेपासून प्रत्यक्ष मांडणीपर्यंतचे विवेचन उपस्थितांना दिले.

### लोकसहभागासाठी खुले निमंत्रण...

प्रदर्शनाला शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थी, अभ्यासक, संशोधक, आणि सामान्य नागरिकांनी भेट द्यावी, असे आवाहन जिल्हा प्रशासन व माहिती विभागातर्फे करण्यात आले आहे. प्रदर्शन सर्वांसाठी पुढील काही दिवस खुले राहणार आहे.

## आणीबाणीत कारावास भोगलेल्या संघर्षयात्रींचा निवासी उपजिल्हाधिकारी यांच्या हस्ते गौरव

नगर – देशात आणीबाणी लागू झालेल्या घटनेस ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने आणीबाणीत कारावास भोगलेल्या जिल्ह्यातील संघर्षयात्रींचा निवासी जिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या हस्ते जिल्हाधिकारी कार्यालयाच्या सभागृहात एका विशेष कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या स्वाक्षरीचे गौरवपत्र, गुलाबपुष्प देवून गौरव करण्यात आला.



आणीबाणीमध्ये कारावास भोगलेल्या संघर्षयात्रींचा निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

यावेळी तहसीलदार (सामान्य प्रशासन) शरद घोरपडे, तहसीलदार श्री.सबनीस, प्रभारी जिल्हा माहिती अधिकारी सुरेश पाटील, माहिती अधिकारी अमोल महाजन, विजय जोशी, विजय वहाडणे, राजाभाऊ मुळे आदी उपस्थित होते.

यावेळी विजय जोशी, विजय वहाडणे व राजाभाऊ मुळे यांनी मनोगत व्यक्त केले. आणीबाणी विरोधात लढा देणाऱ्या संघर्षयात्रींचा शासनाने सन्मान करुन कृतज्ञता व्यक्त केल्याबाबत त्यांनी राज्य शासनाचे आभार व्यक्त केले.

यावेळी निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते म्हणाले, देशात आणीबाणी लागू झाल्याच्या घटनेस ५० वर्षे पूर्ण झाल्यानिमित्ताने आणीबाणीत कारावास भोगलेल्या व्यक्तींचा व त्यांच्या वारसांचा सत्कार करण्यात येत असल्याचे सांगत सन्मानपत्रामध्ये असलेल्या मजकुराचे त्यांनी यावेळी वाचनही केले.

आजच्या या सत्कार सोहळ्यास अनेक वयोवृद्ध व्यक्ती उपस्थित होत्या. जिल्हा प्रशासनाच्यावतीने त्या व्यक्तींचा जागेवर जाऊन त्यांचा सन्मान केला.

# केडगाव उपनगराच्या विकासाची जबाबदारी स्वीकारली

## आमदार संग्राम जगताप यांची ग्वाही; अंबिकानगरमधील नागरिकांच्या प्रश्नाबाबत केली पाहणी


अंबिकानगर मधील नागरिकांच्या प्रश्नाबाबत पाहणी करताना आ. संग्राम जगताप. (छाया - लहू दळवी)

नगर - केडगाव उपनगराच्या विकासाची जबाबदारी आम्ही स्वीकारले आहे, ती पूर्णत्वाकडे नेण्याचे काम केले जात आहे. केडगावकरांनी विधानसभेला माझ्यावर जो विश्वास टाकून मतदान केले, त्याबद्दल केडगावकरांचे आभार मानतो. नियोजनबद्ध विकासाची कामे मार्गी लागत असल्यामुळे चेहरा मोहरा बदलत आहे. केडगाव मधील डीपी व कॉलनी अंतर्गत रस्त्यांची कामे मार्गी लावली आहे. नागरिकांचे मूलभूत प्रश्नांपासून काम केले असल्यामुळे ते समाधान व्यक्त करत आहे. लिंक रोड कामाच्या माध्यमातून केडगावच्या विकास कामात भर पडली असल्याचे मत आ. संग्राम जगताप यांनी व्यक्त केले.

केडगाव उपनगराचे अंबिकानगर हे सर्वात जुनी वसाहत असून या ठिकाणी नागरिकांना विविध प्रश्नांना सामोरे जावे लागत आहे. या प्रश्नांची आ. संग्राम जगताप यांनी पाहणी करत. अंबिकानगरच्या उत्तरेस जो नैसर्गिक ओढा आहे, त्यावर अतिक्रमण झाले असून, अतिवृष्टी झाल्यास, सर्व परिसरामध्ये दुर्गंधयुक्त पाणी घरामध्ये शिरते, ही समस्या गेल्या अनेक वर्षापासून असून तीव्रतेने वाढत आहे. ओढ्यावर ज्यांनी अतिक्रमण केले आहे, ते अतिक्रमण काढून, ओढ्याचा नैसर्गिक प्रवाह आहे तसेच ठेवावा. अंबिकानगर मधील सर्व प्रमुख रस्ते, ड्रेनेज लाईन सहित सिमेंट काँक्रिटीकरण करून मिळावेत, तसेच या परिसरामध्ये अंधाराचे साम्राज्य पसरले असून लाईटची व्यवस्था करून मिळावी. तसेच या परिसरामध्ये ८-८ तास लाईट नसते तरी, स्वतंत्र लाईटची डीपी बसवण्यात यावी. अहिल्यानगर महानगरपालिकेच्या घंटागाडी रोज येणे अपेक्षित आहे तसेच केडगाव येथील जिल्हा सहकारी बँकेच्या मागच्या बाजूस जे नवीन अपार्टमेंट झाले त्यासमोर रस्त्यावरच कचरा टाकला जातो ते ताबडतोब थांबविणे आवश्यक आहे.

अंबिकानगरमध्ये नगर-पुणे रस्त्यावरून जो प्रवेश केला जातो, ते प्रवेशद्वारच भाजीपाला विक्रेत्यांनी अडवलेले आहे. सदर भाजीपाला बाजार या ठिकाणाहून बंद करून त्यांना पर्यायी व्यवस्था आपण कायमस्वरूपी द्यावी. रस्त्याच्या दोन्ही बाजूस भाजीपाला विक्री करणारे बसल्यामुळे शाळेचे लहान मुलं, वृद्ध व नागरिकांना रस्त्यावरून जातांना कायम छोटे-मोठे किरकोळ अपघात होत असतात. आपल्या निधीमधुन जो रस्ता आपण नवीन विकसित केला आहे, तो काय भाजीपाला विक्री करण्यासाठी केलेला नसून, त्यावरील अतिक्रमण ताबडतोब कायमस्वरूपी हटवावे. छत्रपती शिवाजी मंगल कार्यालयाचे नाव: श्री छत्रपती शिवाजी सांस्कृतिक भवन असे करावे अशी मागणी अंबिकानगर मधील नागरिकांनी आ. संग्राम जगताप यांच्या निवेदनाद्वारे केली.

यावेळी मा. नगरसेवक अमोल येवले, सुनीलमामा कोतकर, सुनील कोतकर, जालिंदर कोतकर, अजित कोतकर, महेश गुंड, सुमित लोंढे, बाबासाहेव राशिनकर, संजय बोरगे, शरद आचारी, शिरीष होडे, नंदकुमार पौळ, अजित पवार, दिलीप शेजुळ, प्रमोद शेजुळ, ज्ञानेश देशपांडे, डॉ. श्रीकृष्ण जोशी, राजु लोडगे, प्रवीण रोडे, वसुंधा देशपांडे, निशा बोरगे, सविता लाळगे, प्रियांका शहाणे आदी परिसरातील नागरिक उपस्थित होते.

अंबिकानगर ही जुनी वसाहत असून या परिसरातील विविध प्रश्न प्रलंबित असून ते सोडवण्यासाठी आमदार संग्राम जगताप यांनी पाहणी केली आहे, त्यामुळे हे प्रश्न लवकरच मार्गी लागले जातील. उपनगराची विकासाची कामे मार्गी लागत असल्याने केडगावकर समाधान व्यक्त करत आहे, अशी भावना अमोल येवले यांनी व्यक्त केली.

# राज्यात प्रसिद्ध असलेल्या अहिल्यानगरमधील छोट्या पुढाऱ्याची सोशल मिडीयावर बदनामी

## श्रीगोंदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल


सोशल मिडीयावर बदनामी करणाऱ्या अज्ञात व्यक्तीविरोधात कारवाई करण्याची मागणी छोटा पुढारी घनश्याम दरोडे यांनी पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांच्याकडे केली.

श्रीगोंदा - आपल्या भाषणांमुळे कायम चर्चेत राहिलेला राज्यात प्रसिद्ध असलेल्या श्रीगोंदा तालुक्यातील छोट्या पुढारी तसंच बिग बॉस मराठी फेम घनश्याम दरोडे म्हणजेच छोटा पुढारी कायम चर्चेत असतो. अशातच सोशल मीडियावर छोटा पुढारीचे निधन झाल्याची खोडसाळ माहिती एका युजर्सने प्रसिद्ध केली. काही वेळातच ही बातमी पसरली. घनश्याम दरोडे याचा फोन सतत वाजू लागला. घडलेला प्रकार घनश्याम दरोडे यांच्या लक्षात आला. आपल्या मृत्यूची खोटी माहिती पसरवणाऱ्याला धडा शिकविण्यासाठी त्यांनी याबाबत श्रीगोंदा पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. छोटा पुढारी सध्या शिट्टी वाजली रे या कार्यक्रमात दिसतोय.

श्रीगोंदा तालुक्यातील टाकळी लोणार येथील तसेच आपल्या मजेदार भाषणामुळे राज्यात प्रसिद्ध असणारा घनश्याम दरोडे म्हणजेच छोटा पुढारी कायम चर्चेत असतो. सध्या तो विविध कार्यक्रमात टीव्हीवर दिसतो त्यामुळे त्याने मोठी प्रसिद्धी मिळवली मात्र याचाच फायदा घेत स्वत:ला प्रसिद्धी मिळविण्यासाठी एका अज्ञात व्यक्तीने सोशल मीडियावर खोडसाळपणा करत बिग बॉस फेम घनश्याम दरोडे यांच आज दु:खद निधन. हृदयविकाराच्या आजाराने. भावपूर्ण श्रद्धांजली भाऊ. ही पोस्ट सोशल मिडीयावर व्हायरल करून मोठ्या प्रमाणात प्रसिद्धी मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. मात्र त्याच्या या खोडसाळपणामुळे छोटा पुढारी घनश्याम दरोडे यांना मोठ्या प्रमाणत फोन येऊ लागले. त्यांनी तात्काळ त्यांनी एक व्हिडीओ तयार करून त्यांच्या चाहत्यांना देखील तो व्यवस्थित असल्याची अपडेट दिली आहे. मात्र विनाकारण बदनामी करणाऱ्या व्यक्तीवर कठोरात कठोर कारवाई होण्यासाठी त्यांनी याबाबत पोलीस ठाण्यात अज्ञात व्यक्तीच्या विरोधात तक्रारी अर्ज दाखल केला असून याबबत तात्काळ कारवाई करण्याचे आश्वासन पोलीस निरीक्षक किरण शिंदे यांनी त्यांना दिले आहे.


विनापरवाना नदीपात्रातून बेकायदा वाळू उपसा करुन वाहतूक करणाऱ्यांवर पोलीस अधीक्षक यांच्या पथकाने कारवाई करुन ७५ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

# वाळू उपसा करुन वाहतूक करणाऱ्यावर कारवाई, ७५ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त

## ३ ताब्यात ६ फरार, गुन्हा दाखल

नगर - विनापरवाना नदीपात्रातून बेकायदा वाळू उपसा करुन वाहतूक करणाऱ्यावर पोलीस अधीक्षक यांच्या पथकाने कारवाई करुन ७५ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला. यात तिघांना ताब्यात घेतले. अन्य ६ जण पसार झाले. ही कारवाई नेवासा तालुक्यातील गोदावरी नदीच्या पात्रात गोधेगाव येथे २५ जून रोजी केली.

पोलीस अधीक्षक यांच्या पथकास मिळालेल्या माहितीनुसार नेवासा तालुक्यातील गोधेगाव शिवारातील गोदावरी नदीच्या पात्रात बेकायदा वाळूचा उपसा करणाऱ्यावर छापा टाकून कारवाई केली. या कारवाई दरम्यान पोलिसांची चाहूल लागल्याने वाळू तस्कर वाहनासह पळून जात असताना पोलिसांनी त्यांचा पाठलाग करुन तिघांना ताब्यात घेतले. प्रवीण नामदेव म्हस्के (रा. नेवासा खुर्द), विशाल दत्तात्रय ठोंबरे, अभिषेक भीमराज जाधव (दोघे रा. बोधेगाव ता. नेवासा) अशी ताब्यात घेतलेल्या तिघांची नावे आहेत. ताब्यात घेतलेल्या तिघांकडून पोलिसांनी एक जेसीबी, सहा ट्रॅक्टर ट्रॉली, व पाच ब्रास वाळू एकूण ७५ लाख ८० हजार रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला.

या कारवाई दरम्यान राजेंद्र गोलांडे, दिलीप शेलार (दोघे रा. गोंधेगाव ता. नेवासा), कृष्णा पुनमसिंग परदेशी (रा. नेवासा), कल्याण उन्हाळे (रा. प्रवरा संगम), काका पठारे (रा. धामोरी) व कुबोटा ट्रॅक्टरचा (मालक नाव माहित नाही) हे पसार झाले.

याप्रकरणी नेवासा पोलीस ठाण्यात नऊ जणांविरुद्ध भारतीय न्याय संहिता कलम ३०५ (ई), ३ (५) सह पर्यावरण संरक्षण अधिनियम कलम ३/१५ प्रमाणे गुन्हा दाखल केला. पुढील कारवाई नेवासा पोलीस करीत आहेत

# वैभव नाईकवाडी खून प्रकरणाचा तपास सीआयडीकडे द्यावा; त्या पोलीस अधिकाऱ्यासह व आरोपींची नार्को टेस्टची मागणी

## वंचित बहुजन आघाडीचे जिल्हा पोलीस अधीक्षकांना निवेदन


वैभव नाईकवाडी खून प्रकरणाचा तपास सीआयडीकडे द्यावा या मागणीचे निवेदन जिल्हा पोलीस अधीक्षकांना देण्यात आले.

नगर - वैभव शिवाजी नाईकवाडी या युवकाच्या अमानुष खुनाच्या प्रकरणात पोलीस विभागाच्या निष्काळजीपणाचे आरोप वंचित बहुजन आघाडीने केले आहेत. वैभवचा अपहरण करून निर्घृण खून करण्यात आला व मृतदेह केतकाई परिसरात जाळून टाकण्यात आला. या घटनेची माहिती पोलिस ठाण्याच्या एका अधिकाऱ्याला असूनही त्याने याकडे दुर्लक्ष केल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या प्रकरणी बुधवारी (दि. २५ जून) वंचित बहुजन आघाडीच्या शिष्टमंडळाने जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांची भेट घेऊन सदर गुन्ह्याचा तपास सीआयडीकडे द्यावा व सदर पोलिस अधिकाऱ्याची आणि आरोपींची नार्को टेस्ट करण्याची मागणी करण्यात आली आहे. या शिष्टमंडळात मयत वैभवची आई सीमा नाईकवाडी यांच्यासह वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष योगेश साठे, शहराध्यक्ष हनिफ शेख, ॲड. योगेश गुंजाळ, जे. डी. शिरसाठ, देवीदास भालेराव, गणेश राऊत, प्रसाद भिवसने, राजीव भिंगारदिवे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

काही महिन्यांपूर्वी वैभव नाईकवाडी याचे अपहरण करून त्याला जबर मारहाण करण्यात आली. या मारहाणीतच त्याचा मृत्यू झाला. त्यानंतर आरोपींनी मृतदेह केतकाई परिसरात नेऊन पुरावा नष्ट करण्याच्या हेतूने जाळून टाकला. विशेष म्हणजे या मारहाणीचे फोटो व व्हिडीओ आरोपींनी एमआयडीसी पोलिस ठाण्याच्या अधिकाऱ्याला पाठवले होते. तरीही पोलिस अधिकारी यांनी त्याकडे दुर्लक्ष करुन निवांत बसून राहिले. अन्यथा वैभवचा जीव वाचू शकला असता. वैभवच्या अपहरणाच्या दिवशी त्याच्या आईने तोफखाना पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. परंतु त्या ठाण्यातूनही कोणतीच ठोस कारवाई झाली नाही. त्यामुळे दोन पोलिस ठाण्यांच्या संबंधित अधिकाऱ्यांच्या निष्क्रीयतेमुळे एका अल्पवयीन मुलाचा बळी गेला असल्याचा आरोप करण्यात आला आहे.

या घटनेत संबंधित पोलिस अधिकाऱ्यांनी आरोपींना आर्थिक स्वार्थापोटी व्हीआयपी वागणूक दिली असून, त्यांना या गुन्ह्यातून वगळुन टाकले असल्याचे निवेदनात म्हटले आहे. या अधिकाऱ्यांचे कॉल डिटेल्स, सीडीआर रेकॉर्ड, कॉल रेकॉर्डिंग आणि बँक खात्यांची सखोल चौकशी करण्याची मागणी करण्यात आली आहे. या गंभीर गुन्ह्याचा तपास सीआयडीकडे द्यावा व सदर पोलिस अधिकाऱ्याची आणि आरोपींची नार्को टेस्ट करण्याची मागणी वंचित बहुजन आघाडीच्या वतीने करण्यात आली आहे.

# जिल्ह्यातील सर्व सोनोग्राफी व गर्भपात केंद्रांची विशेष पथकाद्वारे अचानक तपासणी करावी

## जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांच्या सूचना, आरोग्य विभागाच्या कामकाजाचा घेतला आढावा

नगर - जिल्ह्यातील सर्व सोनोग्राफी केंद्र व गर्भपात केंद्रांची विशेष पथकाद्वारे अचानक तपासणी करण्यात यावी. संशयीत गर्भपाताबाबत सविस्तर चौकशी करण्याबरोबरच गरोदर मातांचा नियमित पाठपुरावा करुन लिंगगुणोत्तराबाबत जनमानसांमध्ये व्यापक स्वरुपात जनजागृती करावी. गर्भपातासाठी वापरण्यात येणाऱ्या औषध विक्रीबाबत अन्न व औषध प्रशासन विभागामार्फत नियमित तपासणी करण्याच्या सूचनाही जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी दिल्या.

जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर प्रमाण, साथरोग परिस्थिती, जन्म व मृत्यू नोंदणी व राष्ट्रीय क्षयरोग नियंत्रण कार्यक्रम यासह आरोग्य विभागाचा कार्याचा जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत आढावा घेतला.

यावेळी जिल्हा परिषदेच मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा शल्यचिकीत्सक डॉ. संजय घोगरे, जिल्हा आरोग्य अधिकारी बापूसाहेब नागरगोजे आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील सर्व खाजगी व्यावसायिकांनी डेंग्यू निदान झालेल्या रुग्णांची सविस्तर माहिती शासकीय आरोग्य यंत्रणेला द्यावी. जन्म-मृत्यू नोंदणी करणे कायद्याने बंधनकारक आहे. ज्या रुग्णालयामध्ये जन्म अथवा मृत्यू होईल त्या वैद्यकीय व्यावसायिकांनी या घटनांची नोंद करुन आरोग्य यंत्रणेला माहिती कळविण्याच्या सुचनाही जिल्हाधिकारी डॉ. आशिया यांनी यावेळी दिल्या.

जिल्ह्यातील लिंग गुणोत्तर सुधारणे, साथरोगांना आळा घालणे व जन्म-मृत्यू नोंदणी विहित मुदतीमध्ये करण्यासाठी शासकीय यंत्रणा, स्थानिक स्वराज्य संस्था, खाजगी वैद्यकीय व्यावसायिक, स्वयंसेवी संस्था व नागरिकांनी यांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक असल्याचेही ते म्हणाले.

# अहिल्यानगर शहराच्या मध्यवर्ती भागासह उपनगर भागास एक दिवस विलंबाने पाणी पुरवठा होणार

नगर - मुळानगर ते विळद दरम्यानची मुख्य जलवाहिनीला २६ जून रोजी तीन ठिकाणी गळती झाली होती. या गळतीद्वारे मोठ्या प्रमाणात पाणी वाया जात असल्या कारणाने दुरूस्ती ही त्याच दिवशी तातडीने घेण्यात आली. दुरूस्तीचे काम पूर्ण झालेनंतर पाणी पुरवठा सुरू केला असता २४ जून रोजी दुपारी वाजता नागापूर परिसरात अज्ञात जे.सी.बी. ने मुख्य जलवाहिनीवरील एअर व्हॉलचे नुकसान केले. त्यामुळे या दुरूस्तीचे काम देखील तात्काळ हाती घेवून रात्री उशिरापर्यंत पूर्ण केले. या कालावधीमध्ये शहराचा पाणी पुरवठा विस्कळीत झालेला आहे.

शहराचा पाणी पुरवठा सुरळीत करत असतांना २५ जून रोजी नांदगाव शिवारात ११०० एम.एम. व्यासाच्या मुख्य जलवाहिनीला गळती झाल्याचे निदर्शनास आले आहे. ही दुरूस्ती देखील त्वरीत करणे आवश्यक असल्याने दुरूस्तीचे काम हे २६ जून रोजी घेण्याचे नियोजित करण्यात आलेले आहे. त्यामुळे सदरची मुख्य जलवाहिनीद्वारे होणारा पाण्याचा उपसा बंद राहणार आहे.

त्यामुळे २६ जून रोजी बोल्हेगाव, नागापूर, सावेडी उपनगरातील गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, लक्ष्मीनगर, सूर्यनगर, निर्मलनगर, मुकुंदनगर तसेच केडगाव, नगर-कल्याण रोडवरील शिवाजीनगर परिसर इ. भागास (सकाळी ११.०० नंतरच्या पाणी वाटपाच्या भागास) पाणी पुरवठा होऊ शकणार नाही. सदरचा पाणी पुरवठा हा २७ जून रोजी करणेत येईल. तसेच २७ जून रोजी रोटेशननुसार पाणी वाटपाच्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच मंगलगेट, रामचंद्रखुंट, झेंडीगेट, जुने जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, दाळमंडई, काळू बागवान गल्ली, धरती चौक, बंगाल चौकी, माळीवाडा, कोठी या भागात व गुलमोहर रोड, प्रोफेसर कॉलनी परिसर, सिव्हील हाडको, प्रेमदान हाडको, टी.व्ही. सेंटर परिसर, म्युनिसीपल हाडको इत्यादी भागात महापालिकेमार्फत पाणी पुरवठा करण्यात येणार नाही. या भागातील पाणीपुरवठा शुक्रवारऐवजी शनिवार २८ जूनला करण्यात येईल.

२८ जून रोजी पाणी पुरवठा होवू घातलेल्या शहराच्या मध्यवर्ती भागास म्हणजेच सिध्दार्थनगर, लालटाकी, तोफखाना, दिल्लीगेट, नालेगाव, चितळे रोड, आनंदी बाजार, कापड बाजार, ख्रिस्त गल्ली, पंचपीर चावडी, जुने मनपा कार्यालय परिसर, माळीवाडा, बालिकाश्रम रोड परिसर, व सावेडी इत्यादी भागात पाणी पुरवठा होणार नसून तो २९ जून रोजी करण्यात येईल.

शहरातील पाणीपुरवठा एक दिवस बंद करून उपनगरात ज्या भागात जास्त दिवसाचे रोटेशन आलेले अशा भागात पाणी पुरवठा करण्याचा महापालिकेचा मानस आहे. नागरीकांनी याची नोंद घेवून असलेल्या पाण्याचा वापर काटकसरीने करून महानगरपालिकेस सहकार्य करावे.

# आनंदऋषिजी हॉस्पीटलमधील नवजात बालक अतिदक्षता विभागात प्रदिर्घ अनुभवी डॉक्टर्स दाखल




नगर - येथील आनंदऋषिजी हॉस्पीटलमधील नवजात बालक अतिदक्षता विभागात प्रदिर्घ अनुभव असलेले डॉ.गणेश गव्हाणे व डॉ.विजय साठे हे तज्ज्ञ डॉक्टर्स रूजू झाले आहेत.

हॉस्पीटलच्या ओपीडी विभागात दुपारी १२ ते २ यावेळेत डॉ.दिपि अग्रवाल, डॉ. वैभवी वंजारे आणि सर्जन डॉ.रूपेश सिकची उपलब्ध असतात. ३० बेडचा नवजात बालक अतिदक्षता विभाग येथे असून एन.आय.सी.यु.मध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे वॉर्मर, कृत्रिम श्वासोच्छ्वास यंत्रणा, फोटोथेरपी, रक्तसंक्रमण, सरफॅक्टंट ॲडमिनीस्ट्रेशन, सेंट्रल लाईन इन्सर्शन, नवजात शिशुच्या विविध प्रक्रिया जसे की इंटरकोस्टल ड्रेन इन्सर्शन, ॲसिटिक फ्लुइड टॅपिंग, लंबार पंक्चर इ., नवजात शिशु शस्त्रक्रिया, एकाच छताखाली २ डी-इको, सोनोग्राफी, एम आर आय, सीटी स्कॅन, पॅथॉलॉजी लॅब, एक्स-रे, प्रशिक्षित नर्सिंग स्टाफ, कांगारू मदर केअर, विकासात्मक सहाय्यक काळजी, आईच्या दुधाच्या आहारासाठी प्रोत्साहन, स्तनपानासाठी स्वतंत्र व्यवस्था तसेच सर्व कंपन्यांची कॅशलेस सुविधा उपलब्ध आहे.

नवजात बालकांसाठी महात्मा ज्योतिबा फुले योजने अंतर्गत मोफत उपचार केले जातात. लहान मुलांच्या कोणत्याही आजारावर तज्ज्ञ डॉक्टरांमार्फत उपचार करण्यात येतात. नवजात मुलीच्या उपचारावर २५% सवलत देऊन अल्पदरात उपचार करण्यात येतात. जन्मापासून ५ वर्षांपासून सर्व कंपन्यांचे लसीकरण सोमवार ते शनिवार दरम्यान सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत शासकीय नियमानुसार येथे ना नफा ना तोटा या तत्वावर केले जाते. लसीकरण करण्यासाठी तज्ज्ञ डॉक्टर्स उपलब्ध आहेत.

२६० बेडच्या एन.ए.बी.एच. पूर्ण मान्यताप्राप्त आनंदऋषिजी हॉस्पीटलमध्ये बेसिक, कॉम्प्रेसिव्ह, एक्झिक्युटिव्ह असे लसीकरणाचे तीन पॅकेज उपलब्ध आहेत. आपल्या मुलांना रोगाविरूध्द सक्षम बनविण्यासाठी हे लसीकरण उपयुक्त आहे.

बाळाला कोणतीही समस्या असल्यास ९४०४३९९९११ या भ्रमणध्वनीवर संपर्क साधावा, असे आवाहन जैन सोशल फेडरेशनतर्फे करण्यात आले आहे.


## जाहीर नोटीस

तमाम नागरीकांस या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टात नमुद केलेल्या मिळतीचे विद्यमान मालक **श्री संदिप एकनाथ ऋषी रा. अहिल्यानगर,** यांनी सदर मिळकत निर्वेध निजोखमी असल्याचे खात्री देऊन सदर मिळकतीबाबत आमचे अशिलासोबत सौदा करुन रितसर विसार घेऊन खरेदी देण्याचे मान्य व कबुल केले आहे व लवकरच आमचे अशिल सदरचा खरेदी व्यवहार पुर्ण करणार आहेत. सदर मिळकतीवर कोणत्याही बॅकेचा अथवा वित्तीय संस्थेचा कोणत्याही स्वरुपाचा बोजा नसुन सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणुन या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेखत, मदार, मनाई हुकूम, स्थगीती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही वाद चालू असल्यास संबंधीतांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झाल्यापासून १५ दिवसांचे** आत त्यांचे या मिळकतीशी असणाऱ्या हितसंबंधाबाबतच्या कागदोपत्री पुराव्यानिशी ॲडव्होकेट यांचेकडे या व्यवहारास लेखी हरकत नोंदवावी. या मुदतीत जर कोणाचीही हरकत आली नाही तर ही मिळकत निर्वेध व निजोखमी असल्याचे ग्राह्य धरुन आमचे अशिल त्याचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील मग कोणचीही कोणत्याही स्वरुपाची हरकत ग्राह्य धरली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन** - डी. ।। सब डी. ।। व तालुके नगर पैकी अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील नगर योजना क्र. ४ मधील नगर भूमापन क्र./ फायनल प्लॉट नं. २६९/६ चे एकुण क्षेत्र २९४.००चौ.मी. ही संपुर्ण मिळकत

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस - १२ मीटर रस्ता दक्षिणेस - फायनल प्लॉट नं. २६९/७

पश्चिमेस - फायनल प्लॉट नं. २६९/१७, १६ उत्तरेस - ६ मीटर रस्ता

येणेप्रमाणे चतुः सिमापूर्वक संपूर्ण मिळकत तदंगभुत वस्तु, वहिवाट, वागणूकीचे, जाणेयेणेचे हक्कासह तसेच त्यामधील असलेल्या इतर हक्कासह काहीही एक राखुन न ठेविता असे.

दिनांक २६/०६/२०२५
अहिल्यानगर

**ॲड. विनोद नामदेवराव गायकवाड**
ॲडव्होकेट ॲण्ड नोटरी पब्लीक,
ऑफिस बी-१, गणराज अपार्टमेंट,
जुने जिल्हा न्यायालयासमोर, दादाचौधरी शाळेशेजारी,
अहमदनगर. मो.नं. ९८२२०४३१२३

